दैनिक
# रायगड नगरी
अन्यायाचा प्रतिकार | महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
• वर्ष १६ वे • अंक ३०९ • MAHMAR/2006/17212 • रायगड • गुरुवार दि.३ फेब्रुवारी २०२२ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com

# पनवेल महापालिका हद्दीतील दुकानांचे नाम फलक मराठीत लावणे बंधनकारक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

महाराष्ट्र दुकाने व आस्थापना नियम २०१८ नूसार पनवेल महानगरपालिका हद्दीतील सर्व दुकानांचे नाम फलक मराठी लावण्यात यावे अशी नागरिकांनी मागणी केली होती. त्यानूसार प्रत्येक आस्थापनेचा नामफलक हा मराठी देवनागरी लिपित असणे बंधनकारक असण्याचा कार्यालयीन आदेश आयुक्त गणेश देशमुख यांच्या आदेशानूसार काढण्यात आला आहे.



महाराष्ट्र राज्य शासनाच्या २०१८च्या राजपत्रानूसार प्रत्येक आस्थापनेचा नामफलक हा मराठी देवनागरी लिपीत असणे बंधनकारक आहे. आस्थापनेचे मराठीतील नाव प्रारंभी लिहिणे आवश्यक आहे. आस्थापना चालक नामफलक मराठी देवनागरी लिपी बरोबरच इतर भाषेतही लिहू शकतो. तथापि मराठी भाषेतील नामफलकावरील अक्षरांचा आकार इतर भाषेतील अक्षरांच्या आकारापेक्षा लहान असू नये. तसेच ज्या आस्थापनेत कोणत्याही प्रकारे मद्य विक्रि किंवा मद्यपान सेवा दिली जात असेल अशा आस्थापनेस महापुरूषांची, गड -किल्यांक ची नावे देण्यात येऊ नये असे पालिकेच्यावतीने नमुद करण्यात आले आहे.

# ज्येष्ठ अभिनेते रमेश देव यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन

**दै.रायगड नगरी । मुंबई**

मराठी सिनेसृष्टीतील ज्येष्ठ अभिनेते रमेश देव यांचं हृदयविकाराने निधन झाले. ते ९३ वर्षांचे होते. चार दिवसांपूर्वी त्यांनी ९३ व्या वाढदिवस साजरा केला होता. मुंबईतील धीरूभाई अंबानी रुग्णालयात त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांचा मुलगा आणि अभिनेता अजिंक्य देव यांनी ही माहिती दिली. रमेश देव यांनी मराठी तसेच हिंदी भाषेतील अनेक सिनेमांमध्ये काम केले. त्यातही पत्नी सीमा देव यांच्यासोबतचे सारेच सिनेमे हिट झाले.

रमेश देव आणि सीमा देव यांनी अनेक चित्रपटांत सोबत काम केले. या दोघांचे अनेक चित्रपट चांगलेच गाजले. १९६२ मध्ये त्यांनी वरदक्षिणा या चित्रपटात सोबत काम केले. या चित्रपटावेळीच दोघांचं एकमेकांवर प्रेम जडलं. नंतर कशाचाही उशीर न करता त्यांनी त्याच वर्षी लग्न केलं. २०१३ मध्ये या जोडीच्या लग्नाला ५० वर्षे पूर्ण झाली. यावेळीदेखील दोघांमधील प्रेम तेवढेच फुललेले दिसले होते.

या वर्षी रमेश देव आणि सीमा देव यांचे लग्नाचे ६० वे वर्षे होते. रमेश देव अखेरपर्यंत आपल्या लाडक्या पत्नीसाठी नवनव्या भेटवस्तू घ्यायचे. रमेश देव यांनी आतापर्यंत २८० पेक्षा जास्त चित्रपटांत काम केलं आहे. रमेश देव यांनी चित्रपटसृष्टीत आपला काळ गाजवला.



राजश्री प्रॉडक्शनचा 'आरती' हा त्यांचा पहिला हिंदी सिनेमा होता. आपल्या प्रदीर्घ कारकिर्दीत त्यांनी अमिताभ बच्चन, राजेश खन्ना, शत्रुघ्न सिन्हा यांसारख्या स्टार्ससोबत काम केले.

रमेश देव यांचा जन्म ३० जानेवारी १९२६ रोजी अमरावती येथे झाला. देव यांचे आजोबा अभियंता होते. त्यांनी राजस्थानातील जोधपूर पॅलेसच्या उभारणीत मोठं योगदान दिल्याने कोल्हापूर शहराच्या उभारणीसाठी छत्रपती शाहू महाराजांनी देव यांच्या आजोबांना निमंत्रित केलं. त्यामुळे देव कुटुंब कोल्हापुरात स्थायिक झाले. रमेश देव यांचे वडील शाहू महाराजांचे कायदेशीर सल्लागार होते.

# शिवसेनेचे मा.खा.गजानन बाबर यांचे निधन

**दै.रायगड नगरी । पुणे**

शिवसेनेचे माजी खासदार गजानन धरमसी बाबर (वय ७९) यांचे अल्पशा आजाराने बुधवारी दुपारी चार वाजता बाणेर येथील एका खासगी रुग्णालयात निधन झाले. पोटाच्या विकारामुळे बाबर यांच्यावर शस्त्रक्रिया केली होती. त्यानंतर गेली तीन महिने त्यांच्यावर उपचार सुरू होते. आज सकाळी त्यांची प्रकृती गंभीर झाली होती. सायंकाळी त्यांची प्राणज्योत मावलली.



सभ्य, सुसंस्कृत, अभ्यासू, लोकाभिमूख राजकारणी अशी बाबर यांची प्रतिमा होती. कामगारनगरी पिंपरी चिंचवड शहरात शिवसेना उभी करण्यात बाबर यांचे मोठे योगदान होते. दिवंगत शिवसेनाप्रमुखबाळासाहेब ठाकरे यांच्या हस्ते काळभोरनगर येथे शिवसेनेची प्रथम शाखा त्यांनी स्थापन केली. घरमालक आणि भाडेकरूंच्या वादावर पर्याय काढण्यासाठी बाबर यांनी भाडेकरूंसाठी संघटना स्थापन केली होती. नंतर नगरपालिकेत १९७८ मध्ये ते नगरसेवक होते. पुढे १९८६ मध्ये महापालिका स्थापन झाल्यावर काळभोरनगर प्रभागातून तीन वेळा नगरसेवक झाले. बाबर यांच्या पाथीर्वावर उद्या सकाळी ११ वाजता निगडी येथील स्मशानभमित अंत्यसंस्कार होणार आहेत.

# विरार-अलिबाग कॉरिडोर आंदोलनाचे नेतृत्व करणाऱ्यांचीच प्रकल्पाला सहमती

## आंदोलनकर्त्या शेतकऱ्यांमध्ये संताप



**दै.रायगड नगरी । जीवन केणी**

**उरण** : विरार-अलिबाग कॉरिडोर आंदोलनाचे नेतृत्व करणारेच प्रकल्पाला सहमती मिळविण्यासाठी प्रयत्न करत असल्याने आंदोलनकर्त्या शेतकऱ्यांमध्ये संताप व्यक्त करण्यात येत आहे. येथिल शेतकऱ्यांची भूमिका ही या प्रकल्पाच्या विरोधात कधीच नव्हती मात्र समृद्धी महामार्ग, एनएचएआय, एमटीएचएलने ज्या प्रमाणे भू-धारकांना मोबदला दिला त्या प्रमाणे मिळावा ही माफक अपेक्षा करीत असतांन प्रशासन मात्र कवडीमोल दराने या जमिनी संपादित करण्याचा प्रयत्न करत असल्याने शेतकऱ्यांचा या प्रकल्पाला विरोध आहे.

असे असतांनाही शेतकऱ्यांचे नेतृत्व करणारे काही पुढारी या प्रकल्पाला सहमती द्यावी असे शेतकऱ्यांना सांगत आहेत. चिरनेर येथिल बैठकीत देखिल अशाप्रकारचा ठराव घेण्याचा प्रयत्न झाला मात्र उपस्थित सर्व शेतकऱ्यांनी त्या ठरावाला विरोध केला.विरार-अलिबाग महामार्गासाठी संपादन करण्यात येणाऱ्या जमिनीच्या मोबदल्यावरुन शेतकरी व शासनामध्ये संघर्ष पेटला आहे. प्रकल्पाची मोजणी करण्यासाठी आलेल्या कर्मचाऱ्यांना दोन वेळा येथिल शेतकऱ्यांनी हुसकावून लावले होते.

उरण तालुक्यातील १६ गावांच्या जमिनी या प्रकल्पाकरीता लागणार आहेत. या पैकी ११ गावांनी या प्रकल्पाला जमिनी देण्यास सहमती दिली असल्याचे तहसिलदारांचे म्हणणे आहे. मात्र ज्या ११ गावातील शेतकऱ्यांनी सहमती दिली आहे. तेथील ८० टक्के जमिनी शेतकऱ्यांनी या पूर्वीच विकसकांना विकल्या आहेत. त्यामुळे एमएमआरडीएला तीथे विरोध झाला नाही. मात्र उरलेल्या पाच गावातील जमिनी शेतकरी पिकवत असल्याने त्या विकल्या नाहीत.प्रकल्पाला शेतकऱ्यांचा विरोध नाही मात्र त्यांना योग्य मोबदला मिळावा,यासाठी लढा सूरू असताना काही पुढारी शेतकऱ्यांची अल्प मोबदल्यावर बोलवण करून या प्रकल्पासाठी जमिनी मिळवून देण्याचा प्रयत्न करत आहेत.

दरम्यान प्रशासनाकडून देखिल शेतकऱ्यांना शांत करण्यासाठी आत्ता प्रति गुंठा रेडी रेकनर च्या चारपट भावा ऐवजी येथे झालेल्या जमिन व्यवहाराच्या प्रति गुंठा चार पट अशा भावाचा प्रस्ताव तयार करण्याच्या प्रयत्नात आहे. प्रशासनाने तयार केलेल्या प्रस्तावानुसार चिरनेर येथे प्रति गुंठा १ लाख ५० हजार कळंबुसरे येथे २ लाख तर चिखली भोम येथे १ लाख ७५ हजार रूपयांने सरासरी जमिनीचे व्यवहार झाला असल्याने त्याच्या चार पट भाव देण्याचे प्रस्तावित आहे.

# डुक्कराची शिकार करणाऱ्या दोघांना अटक



**दै.रायगड नगरी । गणेश प्रभाळे**

**दिघी** : श्रीवर्धन तालुक्यातील श्रीवर्धन पोलिस ठाण्यात रानटी डुकरांची बारा बोअरने (बंदुक) शिकार करून मांसाची विल्हेवाट लावण्याच्या बेतात असलेल्या दोघांना श्रीवर्धन पोलिस ठाण्याच्या चमूने अटक केली. ही कारवाई बुधवार (ता २) सकाळी ७ वाजता करण्यात आली.

चार्ली वैती व ग्लेन वैती असे अटक केलेल्यांची नावे आहेत ते कांदिवली चे रहिवासी असून बागमांडले येथे त्यांचे फार्म हाऊस आहे. श्रीवर्धन पासून १८ किलोमीटर अंतरावर असलेल्या बागमांडले परिसरातील शेतशिवारात जंगली डुकराची शिकार होत असल्याची गुप्त माहिती श्रीवर्धन पोलिसांना मिळाली. त्यानंतर सकाळी घटनास्थळ गाठून धाड टाकली. यात घटनास्थळावरच पत्र्याच्या शेड मध्ये आरोपी डुकराच्या मांसाची विल्हेवाट लावत असताना आढळले. पोलिसांच्या तपासात काही मांस हा फ्रीज मध्ये ठेवल्याचे देखील आढळले.

घटनास्थळावर एकच डुक्कर असल्याचे पोलिसांनी सांगितले. दोघांना .../२

# रेशनिंगचे स्वस्त धान्य वितरण खोळंबले

## गोदामातील संपामुळे स्वस्त धान्य दुकानांच्या पुरवठ्याला लगाम

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील रेशनिंग दुकानांना धान्य पुरवठा करणाऱ्या कळंबोली येथिल गोदामांमध्ये २० जानेवारीपासून संप सुरू झाल्याने उरणच्या स्वस्त धान्य वितरणाला लगाम बसली आहे. परिणामी रेशनिंग दुकानांवर धान्यच उपलब्ध नसल्याने तालुक्यातील गरीब गरजू जनतेला रेशनिंगच्या धान्याला वंचित रहावे लागले आहे.

रायगड जिल्ह्यातील रेशनिग दुकानांना कळंबोली येथे असणाऱ्या एफ सी आय च्या गोदामांमधून स्वस्त धान्य वितरण केले जाते. उरण तालुक्यातील ६८ स्वस्त धान्य दुकानांना सुद्धा याच गोदामांतून सुमारे ४ हजार ५०० क्विंटल गहू तांदळाचा धान्य पुरवठा होतो. मात्र २० जानेवारीपासून सदर गोदामांमध्ये संप सुरू झाल्याने रायगड जिल्ह्यातील स्वस्त धान्य वितरण व्यवस्था ठप्प झाली आहे.त्यामुळे उरण तालुक्यातील रेशनिंग दुकानांवर धान्य पुरवठा न झाल्याने गरीब गरजू जनतेला स्वस्त धान्यापासून वंचित रहावे लागले आहे.

रेशनिंगवर गहू व तांदूळ स्वस्त दरात तसेच आदिवासींना अत्यंत अल्प दरात उपलब्ध होत असल्याने हजारो गोरगरिबांना सध्या पोटभर अन्न मिळत आहे.

मात्र सध्याच्या धान्य वितरणाला लगाम लागल्याने गोरगरीब जनतेच्या भुकेचा प्रश्न निर्माण झाला आहे. मात्र हे धान्य वितरण लवकरच सुरळीत होईल असे उरण तालुका धान्य वितरण पुरवठा अधिकारी सोमनीगा बिराजदार यांनी स्पष्ट केले.

## संक्षिप्त...

### आ.नितेश राणे यांना ४ फेब्रुवारीपर्यंत पोलिस कोठडी

**सिंधुदुर्ग: वृत्तसंस्था**

संतोष परब हल्ला प्रकरणी भाजप आमदार नितेश राणे यांना कणकवली दिवाणी न्यायालयाने ४ तारखेपर्यंत अर्थात २ दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे. यामुळे नितेश राणे यांना पुढील दोन दिवस कणकवली पोलिस ठाण्यातील कोठडीत राहावे ला-गणार आहे.

न्यायालयासमोर आत्मसमर्पण केल्यानंतर भाजप आमदार नितेश रामे यांना अटक होण्याची शक्यता व्यक्त केली जात होती. आत्मसमर्पण केल्यानंतर नितेश राणे यांना न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली होती. मात्र, सरकारी वकील ॲड प्रदीप घरत यांनी नितेश राणे यांच्या पोलीस कोठडीची मागणी केली. त्यानंतर न्यायालयाने पोलिसांना आपले म्हणणे मांडण्यास सांगितले होते. पोलिसांना या प्रकरणाच्या तपासासाठी नितेश राणे यांची पोलीस कोठडी गरजेची आहे का, असा सवाल न्यायालयाने पोलिसांना विचारला. त्यानंतर पोलिसांचा अहवाल आल्यानंतर न्यायालयाने नितेश राणे यांच्या पोलीस कोठडी ठोठावली.

# २० हजारांची लाच स्विकारल्याप्रकरणी सरपंच लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या अडकले जाळ्यात

**दै.रायगड नगरी । पनवेल**

२५ हजारांची लाचेची मागणी करून तडजोडी अंती २० हजारांची लाच स्विकारताना आज तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत उसर्ली खुर्दचे सरपंच अतुल तांबे यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने रंगेहाथ पकडले आहे.



यातील तक्रारदार हे कॉंट्रॅक्टर असून त्यांच्याकडे पनवेल येथील मौजे डेरवली मातोश्री सोसायटी समोरील रस्ता तसेच मौजे डेरवली बस थांबा ते साई निकेतन पर्यंतचा रस्ता कॉंक्रीटीकरणाचे विकास कामाच्या मूल्यांकन दाखल्यावर स्वाक्षरी करण्याकरिता लोकसेवक अतुल तांबे (वय-२५) याने त्यांच्याकडे २५ हजारांची लाचेची मागणी केली होती. तडजोडी अंती २० हजार कबूल करण्यात आले. त्यानुसार सदर रक्कम स्वीकारताना लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय नवी मुंबईच्या पथकाने विचुंबे गाव, नवीन पनवेल येथे सापळा रचून त्यांना रंगेहाथ पकडले आहे. या गुन्ह्याची नोंद पनवेल शहर पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे.

# प्रितम म्हात्रे यांच्या तत्परतेने भुयारी मार्गावरील साचलेल्या पाण्याचा प्रश्न निकाली

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महानगरपालिकेचे विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांच्या तत्परतेमुळे पनवेल रेल्वे स्थानकामधील भुयारी मार्गावर साचणाऱ्या पाण्याचा प्रश्न निकाली निघाला आहे.

पनवेल रेल्वे स्थानका मधील भुयारी मार्गातील पायऱ्यांजवळ पाणी साचले होते, गेले दोन दिवस थोड्या प्रमाणात पाणी होते परंतु आज पाण्याचे प्रमाण वाढले होते आणि त्यामुळे महिला आणि ज्येष्ठ नागरिकांना त्या ठिकाणाहून पायी चालणे त्रासाचे झाले होते. याबाबत तेथील प्रवाशांनी याची माहिती पनवेल महानगरपालिकेचे विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे यांना दिली. सदर तक्रारी बाबत त्वरित कार्यवाही करून तेथील अधिकारी राजेश पाटील यांच्या कडून माहिती घेतली असता सदर बेसमेंटमध्ये पाणी उपसा करणारी मोटर नादुरुस्त झाली होती. त्यामुळे जास्त प्रमाणात पाणी साचले होते हे त्यांनी मान्य केले. येत्या १२ तासात आम्ही सदर मोटर दुरुस्त करून चालू करू असे त्यांनी प्रीतम म्हात्रे सांगितले. त्याप्रमाणे सदर मोटर दुरुस्त करून पाणी उपसा सुरू झाला व त्या ठिकाणी साचलेल्या पाण्याचा निचरा झाला. याबद्दल विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांचे प्रवाशी वर्गाने आभार मानले आहेत.

# नगरपरिषदेच्या कचरा संकलन डब्ब्याची अवस्था दयनीय

## कर्जत नगरपरिषदेच्या मदतीसाठी फक्त १ रुपया आवाहन

**दै.रायगड नगरी । संजय गायकवाड**

**कर्जत** : नगरपरिषदेच्या कचरा संकलन डब्ब्याची अवस्था दयनीय झाली आहे, ते डब्बे अजून बदलले नाहीत म्हणून माहिती अधिकार कार्यकर्ता प्रभाकर गंगावणे यांनी सोशल मीडियावर कर्जत नगरपरिषदेच्या मदतीसाठी... फक्त १ रुपया मदतीचे आवाहन नागरिकांना केले आहे.



कर्जतकरांच्या कररुपी पैशातुन सुमारे ६० लाख रूपये खर्च करून नगरपरिषदेने रस्ता साफ करण्याची बिन कामाची भव्यदिव्य अशी गाडी आणली आणि ती धुळखात पडली आहे.भरमसाठ वाढ केलेली घरपट्टी, पाणीपट्टी मुदतीत न भरल्यावर त्यावर व्याज लावुन नरपरिषद कर वसुल करते.आणि त्यामानाने कर्जतकरांना सोई सुविधा मात्र कागदोपत्रीच दिल्या जात आहेत.

तत्कालीन मुख्याधिकारी रामदास कोकरे यांची बदली झाल्यापासुन सोई सुविधांची प्रत्यक्ष व तात्काळ अंमलबजावणी होत नसल्यामुळे कर्जतकर रहिवाशांना शारीरिक व मानसिक त्रासाला सामोरे जावे लागत आहे. प्रसिद्धीच्या वेळेसच प्रकटणारे विद्यमान मुख्याधिकारी डॉ. पंकज पाटील कधीच समस्या जाणुन घेण्यासाठी शहरात दिसत नाहीत. कर्जत नगरपरिषदेला मुख्याधिकारी आहेत कि नाही हेच समजत नाही.

आज कित्येक महिन्यांपासुन शहरा-तील कचरा संकलन करणारे स्वच्छता कर्मचारी अत्यंत बिकट परिस्थितीत आपले काम न चुकता करत आहेत, सणसुद असो वा असो महामारी आपली कामाची वेळ ते कधीही चुकवत नाहीत, ही बाब नगरपरिषदेच्या निदर्शनास आणुन दिली असता नगरपरिषदेचे कर्तव्यतत्पर अधिकारी म्हणतात मग, काय झालं त्यांचं ते काम आहे.

वाह रे वाह... त्यांचं ते काम मग तुम्ही जो कामचुकारपणा करत आहात त्याच काय..? कुठल्याही प्रकारची सुरक्षिततेची साधनं नसताना देखील स्वच्छता कर्मचारी कर्तव्य निभावत आहेत आणि काहीही काम न करता अधिकारी कार्यालयात ढिम्म बसुन आहेत. सांगायचा मुख्य मुद्दा हा की, कर्जत नगरपरिषदेच्या अनेकदा निदर्शनास आणुन देखील कचरा संकलन करणारे डब्बे बदलण्यास नगरपरिषद टाळाटाळ करत आहे.

तरी, शहरातील सर्व रहिवाशांना नम्र विनंती की, कचरा संकलन करून नेणा-या सायकल मधील दुर्दशा झालेले डब्बे बदलण्याकरीता आपण किमान एक रुपयाची आर्थिक मदत करावी. एक एक रुपयाची जरी सर्व कर्जतकर रहिवाशांनी मदत केली तरी नगरपरिषदेला कचरा संकलन करणारे डब्बे घेऊन देता येतील असे आवाहन सोशल मीडियावर माहिती अधिकार कार्यकर्ता प्रभाकर गंगावणे यांनी केले आहे.

# तळोजा येथील पादचारी भुयारी मार्गातील दिवे बंद

**दै.रायगड नगरी । पनवेल**

तळोजा रेल्वे फाटकातील पादचारी भुयारी मार्गातील दिवे बंद असल्यामुळे नागरिकांना जीव धोक्यात घालून रेल्वे रुळ ओलांडावे लागत आहेत.दरम्यान, तळोजा येथील भुयारी पादचारी मार्गातील विद्युत दिवे बंद असल्याने रात्री मार्गक्रमण करताना अनुचित प्रकार घडल्यास त्यास कोण जबाबदार?, असा प्रश्न महिला आणि नागरिकांकडून विचारला जात आहे.

दिवा–पनवेल मार्गावरील तळ–ोजा रेल्वे फाटकवर होणारी वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी सिडको आणि रेल्वे प्रशासनाने वाहनांसाठी पंधरा मीटर लांबीचा तर पादचाऱ्यासांठी तीन मीटर अंतराचा असे दोन भुयारी मार्ग उभारले आहेत. रेल्वे प्रशासनाने मागील वर्षी ९ नोव्हेंबर रोजी वाहनांसाठी तळोजा रेल्वे फाटकवर भुयारी मार्ग सुरु केला. दरम्यान, रेल्वे प्रशासनाने काही दिवसांनी पादचाऱ्यांसाठी उभारलेल्या भुयारी मार्गात विद्युत दिव्यांची सोय उपलब्ध करुन दिली. मात्र, सदर विद्युत दिवे गेल्या काही महिन्यापासून बंद असल्यामुळे पादचाऱ्यांना तळोजा रेल्वे फाटकवर जीव धोक्यात घालून रेल्वे रुळ ओलांडावा लागत आहे. पादचारी भुयारी मार्गातील दिवे बंद असल्यामुळे रात्रीच्या वेळी पायी जाणाऱ्या महिला, मुले–मुली आणि नागरिकांना मोबाईलचा आधार घ्यावा लागत आहे. विशेषतः पादचारी मार्ग पार करण्यासाठी पाच मिनिटे लागतात. तळ–ोजा रेल्वे फाटकवरील भुयारी मार्गातील दिवे आणि वायर यांची चोरी झाली आहे. दरम्यान, तळोजा रेल्वे फाटकातील पाद–चारी भुयारी मार्गातील दिवे बंद असल्याने रात्रीच्या वेळी काही गर्दुल्ल्यांकडून अनुचित प्रकार घडल्यास त्यास कोण जबाबदार?, असा प्रश्न महिलांना पडला आहे. तळोजा रेल्वे फाटकातील पादचारी भुयारी मार्गातील बंद असलेल्या विद्युत दिवे सुरु करण्यासाठी कोणीही तोंड उघडत नसल्यामुळे महिला वर्गात संतापाचे वातावरण पसरले आहे.

# महिलांवरील अन्यायाविरुद्ध नारीशक्ती जागृत झाली पाहिजे : नम्रता कासार-खेडेकर

**दै.रायगड नगरी । राजीव नेवासेकर**

**कोर्लई** : आधुनिक काळातील महिला अबला न राहता सबला बनली पाहिजे.समाजात महिलांवरील होणा–या अन्यायाविरुद्ध आवाज उठविण्यासाठी तिच्यातील नारीशक्ती जागृती झाली पाहिजे.असे भावपूर्ण विचार मुरुड तालुक्यातील काशिद ग्रामपंचायतीत महिलांसाठी आयोजित हळदी–कुंकू कार्यक्रम प्रसंगी सरपंच नम्रता कासार–खेडेकर यांनी व्यक्त केले.

मुरुड तालुक्यातील काशिद ग्रामपंचायतीत सरपंच नम्रता कासार–खेडेकर मान्यवरांच्या हस्ते हळदी कुंकू कार्यक्रम आयोजित करण्यात आला.कोरोना– ओमायक्रॉन रोगाच्या पार्श्र्वभूमीवर शासनाच्या अटि शर्ती व नियमांचे पालन करण्यात येऊन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी ग्रामपंचायत सरपंच निलम पाटील(साळाव), सुचिता पालवणकर (मांडला), काशिद ग्रामपंचायतीच्या सरपंच नम्रता कासार–खेडेकर, उपसरपंच मयुरी धार्वे,सदस्या वर्षा दिवेकर, जान्हवी दिवेकर,तुळसा पवार तसेच सर्वा, चिकणी व काशिद येथील महिला उपस्थित होत्या.

प्रजासत्ताक दिन व मकरसंक्रांतीचे औचित्य साधून चिकणी येथील ग्रामपंचायतीच्या सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात सुरुवातीला सर्व उपस्थितांचे स्वागत करण्यात आले.

यावेळी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात येऊन कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली.

यानिमित्ताने ग्रामपंचायत प्रांगणात मनमोहक रांगोळी काढण्यात आली होती. यावेळी सरपंच नम्रता कासार–खेडेकर मान्यवरांच्या हस्ते उपस्थित महिलांना तीळगुळ,हळदी–कुंकू, सौभाग्य वाण देण्यात आले.

## निवासी नायब तहसीलदार अलिबाग यांचे कोर्टात

क्रमांक : आरटीएस/पि.पा.अ.क्र.०७/२०२०
तहसीलदार अलिबाग यांचे कार्यालय
अलिबाग दि.३१/०१/२०२२

प्रति,
१) श्री.आत्माराम शंकर जुईकर
रा.कमळपाडा, पो.शहाबाज,
ता.अलिबाग, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

१) श्रीम.द्वारकाबाई दत्तात्रेय जुईकर
रा.कमळपाडा, पो.शहाबाज,
ता.अलिबाग, जि.रायगड — सामनेवाले

अर्जदार व सामनेवाला यांस कळविण्यात येते की, खाली निर्दिष्ट केलेल्या जमिनीबद्दल अर्जदार यांनी पिकपाहणी संदर्भात अर्ज दाखल केला आहे. त्याची सुनावणी या कार्यालयाकडे सुरू आहे. त्याची सुनावणी दि.१५/०२/२०२२ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता करणेचे निश्चित झाले आहे. सदर अर्जाकामी व खाली निर्दिष्ट केलेल्या मिळकती संदर्भात अर्जदार व आपल्यामध्ये झालेले करारपत्र या जमीन कसत असल्याबाबतची कागदपत्रे घेवून तुम्ही अगर तुमचे प्रतिनिधी यांनी तहसील कार्यालय अलिबाग येथे हजर रहावे. वरीलप्रमाणे तुम्ही स्वतः अगर तुमचे प्रतिनिधीमार्फत सर्व साक्षीपुरावे व कागदपत्रांसह वरील ठिकाणी हजर न राहिल्यास सदर हरकत प्रकरणी आपणास काही स्वारस्य नसल्याचे समजण्यात येवून, प्रकरणाची सुनावणी तुमचे गैरहजेरीत घेण्यात येवून गुणवत्तेनुसार निकाल दिला जाईल याची नोंद घ्यावी.

**वादातील जमिनीचा तपशिल**

| अनु क्र. | गावाचे नाव | ग.नं./स.नं./हि.नं. | क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|---|
| १ | शहाबाज | २०४ | ०–२३–२० | २.४४ |

ठिकाण : अलिबाग
दिनांक : ३१/०१/२०२२

**सही/–**
**निवासी नायब तहसीलदार**
**अलिबाग**

मा.सोनवणे साहेब कोर्ट

वकील : प्रतिभा पाटील

## जाहीर नोटीस

पनवेल येथील दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर, पनवेल यांच्या न्यायालयात
चौ.अर्ज क्र.२००६/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.०४/०३/२०२२

श्रीमती.अमिता अभिजीत शेठ व इतर १ — अर्जदार

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, ज्याअर्थी अभिजीत सुर्यकांत शेठ यांचे दि.३०/०४/२०२१ रोजी पाटील हॉस्पिटल पुणे येथे निधन झाले असून व सदर मयत अभिजीत सुयकांत शेठ यांच्या खालील नमूद मालकीच्या मिळकती संदर्भात मयत अभिजीत सुर्यकांत शेठ, यांचे वारस असल्याबाबत अर्जदार यांनी वारस दाखला मिळण्याकरिता मे.कोर्टात अर्ज केला आहे.

**मिळकतीचे परिशिष्ट**
**फ्लॅट नं.३०१, तिसरा मजला, पद्मावती विला, प्लॉट नं.२० डी, सेक्टर १८, उलवे, नवी मुंबई–४१०२०६**
**ज्याची किंमत एकूण रक्कम रु.२१,५०,०००/– एवढी आहे.**

त्याअर्थी सदर अर्जदार यांस त्यांचे मागणीप्रमाणे वारस दाखला देणेस कुणाचीही हरकत असल्यास अशा इसमाने त्यांची लेखी हरकत जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात सादर करावी. विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास या अर्जदारांस त्यांचे विनंतीप्रमाणे वारस दाखला लिा जाईल, याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आज दि.२/२/२०२२ रोजी माझ्या सहीने व मे.कोर्टाचे शिक्क्यानिशी दिली आहे.

**सही/–** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — (कोर्टाचा शिक्का) — **सही/–** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

# संस्कार भारतीचे शिबिर कर्जतमध्ये संपन्न

**दै.रायगड नगरी । कर्जत**

संस्कार भारती कर्जत समितीचे एकदिवशीय शिबिर नुकतेच संपन्न झाले, या शिबिरात कर्जत, पनवेल व नवीन पनवेल या समित्यांचे एकत्रीकरण या स्वरुपाचा हा कार्यक्रम होता.

कै. अनंत श्रीधर ओक वनौषधी संशोधन व संवर्धन यांच्या सभागृहांत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते सायली कुंभार व शिल्पा गुजराथी यांनी काढलेली आकर्षक रांगोळी उपस्थितांचे लक्ष वेधून घेत होती. नटराज पुजन व दीप प्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात चांगली झाली.

कोकण प्रांताचे पदाधिकारी संजय गोडसे, गणेश वाणी, विजय काळे, शैलेश भिडे, चेतन कोळंबकर व सुनिता खरे तसेच ओक वनौषधीचे व्यवस्थापक सदशिव कुलकर्णी व कर्जतचे पांडुरंग गरवारे आणि भारती म्हसे उपस्थित होते.

## पनवेल महानगरपालिका
### जाहीर नोटीस सूचना

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेवून उक्त अधिनियम कलम ८ (३) अन्वये या नोटीसीद्वारे असे जाहीर करण्यात येते की,

| अ.क्र. | अर्जदाराचे नाव व पत्ता | झाडांचा प्रकार व संख्या | झाडे तोडण्याचे कारण |
|---|---|---|---|
| १ | मोहम्मद झैदी, उप महाव्यवस्थापक, बॉम्बे मर्कंटाईल को.ऑ.बँक लि., प्लॉट नं.२२, से–७, खारघर | ०४ खजूर झाडे तोडणे | पनवेल महानगरपालिका हद्दीतील आमच्या बँकेच्या ताब्यातील जागा शाह हाईट्स, पहिला मजला, प्लॉट क्र.२२, सेक्टर–७, खारघर, नवी मुंबई येथे आहे. आमच्या बँकेच्या आवारात असलेल्या इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावरील सोसायटीच्या बागेतील छत आणि भिंतीमधून पाण्याची गळती आणि पाणी गळतीची समस्या खुप दिवसांपासून भेडसावत आहे. आम्ही तुम्हाला याद्वारे विनंती करतो की, सोसायटीच्या दुसऱ्या मजल्यावर लावलेली मोठी झाडे तोडण्याची परवानगी मिळणेबाबत. |
| २ | श्री.निलेश जीवन गांधी, डायरेक्टर, सौमय्या एजन्सी प्रा.लि.तर्फे २२३/२२४, स्वास्तिक दिसा कॉरपोरेट पार्क, एल.बी.एस.मार्ग, श्रेयस सिनेमा समोर, घाटकोपर (वेस्ट), मुंबई–४०००८६ | ०१ रेन ट्री झाड तोडणे | पनवेल महानगरपालिका हद्दीतील मे.सौमय्या एजन्सीज प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट क्रमांक–२८, सेक्टर ९ नोड न्यू पनवेल ठिकाणी एक वृक्ष असून आमच्या बांधकाम क्षेत्रात येत असून त्याचा अडथळा होत आहे. तरी मला ते एक वृक्ष तोडण्याची परवानगी मिळणेबाबत. |

सदर प्रस्तावास वृक्ष तोडण्याची परवानगी देण्याचा वृक्ष प्राधिकरणाचा इरादा आहे. याबाबत नागरिकांच्या काही हरकती अगर सूचना असल्यास ही सूचना प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरुपात पनवेल महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरण विभागामध्ये सादर कराव्यात. विहित मुदतीत सादर न झालेल्या हरकती अगर सुचनेचा विचार करण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

पमपा/उद्यान/२१२२/प्र.क्र.१२/३३/२०२२
दिनांक : ०२/०२/२०२२

**सही/–**
**सहा आयुक्त**
**तथा**
**वृक्ष अधिकारी**
**पनवेल महानगरपालिका**

पृष्ठ क्र.१ वरुन...

## डुक्कराची शिकार करणाऱ्या दोघांना अटक

अटक करून त्यांच्याकडून बंदुक, काडतुसे व शिकारी साठी वापरलेली झायलो कर पोलीसांनी ताब्यात घेतली आहे. एकून साडेचार लाखांचा माल पोलिसांनी जप्त केले. ही कारवाई सहा पोलिस निरीक्षक आर बी आल्हाट व राकेश म्हात्रे यांनी केली. न्यायालयाने आरोपींना ४ फेब्रुवारी पर्यंत कोठडी सुनावली आहे.

# कु.आदिती तटकरे यांचा रायगड जिल्हा दौरा

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

राज्यमंत्री उद्योग आणि खनिकर्म, पर्यटन, फलोत्पादन, क्रीडा व युवक कल्याण, राजशिष्टाचार, माहिती व जनसंपर्क, विधी व न्याय तथा पालकमंत्री रायगड ना.कु.आदिती तटकरे यांचा गुरुवार, दि.०३ फेब्रुवारी २०२२ रोजीचा रायगड जिल्हा दौरा पुढीलप्रमाणे– गुरुवार, दि.०३ फेब्रुवारी २०२२ रोजी सकाळी १०.३० वा. सुतारवाडी येथून शासकीय वाहनाने दमखाडी, ता.रोहाकडे प्रयाण. सकाळी ११.०० वा. दमखाडी रोहा येथे आगमन व श्री गणपती मंदिर प्राणप्रतिष्ठापना व कळशारोहण सोहळा. दुपारी १२.०० वा. रोहा येथून शासकीय वाहनाने वरसगावकडे प्रयाण. दुपारी १२.३० वा. वरसगाव येथे आगमन व नवज्योत मित्र मंडळास माघी गणेशोत्सवानिमित्त भेट. दुपारी १.३० वा. वरसगाव येथून शासकीय वाहनाने मुगवली, ता.माणगावकडे प्रयाण. दुपारी २.०० वा. मुगवली येथे आगमन व श्री स्वयंभू गणपती मंदिर येथे श्री गणेश जन्मोत्सव समारंभास उपस्थिती. दुपारी २.३० वा. मुगवली, ता.माणगाव येथून शासकीय वाहनाने गणेशनगर, ता.म्हसळाकडे प्रयाण. दुपारी ३.३० वा. गणेशनगर येथे आगमन व श्री गणेश मंदिर जिर्णोध्दार व लोकार्पण सोहळा समारंभास उपस्थिती. सायं. ४.३० वा. गणेश नगर म्हसळा येथून शासकीय वाहनाने मुंबईकडे प्रयाण.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे : बेलवली, ता.पनवेल, जि.रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे ७/१२ चे उताऱ्यावरील कब्जेदार सदरांत नमूद असलेल्या जमीन मालकांकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : बेलवली, ता.पनवेल, जि.रायगड येथील मिळकत**

| जमीन मालकांचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्रफळ | आकार रु. |
|---|---|---|---|---|
| १) श्री.हरिभाऊ दामू पाटील<br>२) श्री.अशोक दामू पाटील<br>३) श्रीमती.धाकली दामू पाटील<br>४) श्री.सुरेश दामू पाटील<br>५) श्री.दत्तात्रेय अनंत गायकर<br>६) सौ.शशिकला अनंत मालुसरे<br>७) सौ.मुक्ता जनार्दन भोईर | १४० | ० | ०.१६.४०<br>पो.ख.०.०१.३०<br>एकूण क्षेत्र<br>०.१७.७० | २.८७ |

तरी सदर मिळकतीबाबत होणाऱ्या खरेदी व्यवहारांस कोणाही व्यक्तीची / संस्थेची कोणत्याही स्वरुपाची हरकत, दावा, तक्रार, दंग दावा, वहिवाटी हक्क, हितसंबंध, खरेदी, गहाण, दान, बक्षिस, पोटगी, लिज, लीएन, सदर मिळकतीतून जाण्या येण्याचे वहिवाटी अथवा ईजमेंटचे हक्क इत्यादी असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचे पत्यावर लेखी नोंदवावी.

वरील विहित मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न प्राप्त झाल्यास नोटीसीत नमूद केलेली मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे व मिळकतीचे मालकांचे मालकी व वहिवाटी हक्कासंबंधात कोणताही वाद नाही असे समजून सदरचा व्यवहार पूर्ण करण्यात येईल याची संबंधितांनी नोंद घ्यावी. तसेच विहित मुदतीनंतर प्राप्त होणारी हरकत आमचेवर बंधनकारक राहणार नाही, कृपया याची नोंद घ्यावी.

दि.०२/०२/२०२२

**सही/–**
**ॲड.सागर काशिनाथ कोंडीलकर**
**ऑफिस शॉप नं.२१, पहिला मजला**
**महानगरपालिका कॉम्प्लेक्स, पनवेल,**
**ता.पनवेल, जि.रायगड**

अर्जदारतर्फे ॲड.प्रतिक्षा प्रकाश वडे

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो, यांचे कोर्टात
फौ.चौ.अर्ज क्र.१०३/२०२२

सौ.विशाखा विलास वडे — अर्जदार

विरुद्ध

ग्रामपंचायत दुंदरे — सामनेवाले

अर्जदार यांचा जन्म दि.०६/०४/१९६२ रोजी मौजे : गुळसुंदे, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड येथील राहत्या घरी झालेला आहे. अर्जदार यांचा जन्म झाला त्यावेळी सदर जन्माची नोंद ग्रामपंचायत गुळसुंदे येथे जन्म–मृत्यूनोंद रजिस्टरमध्ये करण्याची नजरचुकीने राहून गेली होती. त्यामुळे सदर उतारा अभिलेख कक्षात आढळ हात नसल्याचे लेखी पत्र तहसीलदार, पनवेल यांनी अर्जदार यांस दिले आहे. सबब अर्जदार यांचा जन्माचा दाखला मिळणेकरिता सदरचा अर्ज मे.कोर्टात दाखल केलेला आहे.

सबब तसा जन्माचा दाखला देण्यासंबंधी कोणाचीही कोणतीही हरकत असल्यास त्यांनी लेखी स्वरुपात तारीख ९/३/२०२२ रोजी मे.कोर्टात दाखल करावी. अन्यथा अर्जदारास सौ.विशाखा विलास वडे यांचा जन्माचा दाखला दिला जाईल.

आज दि.२/२/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिली.

**सही/–** **क.लिपीक** **प्रथमवर्ग न्याय.पनवेल** — (कोर्टाचा शिक्का) — **सही/–** **सहा.अधिक्षक** **प्रथमवर्ग न्याय.पनवेल**

मा.गोडसे सो

अर्जदारातर्फे वकील
विवेक सदाशिव तावडे

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांच्या कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.९९/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.२२/०३/२०२२

१) श्रीमती.कल्पना राजेंद्र भोईनकर, वय : ४८
२) कुमार वेदांग राजेंद्र भोईनकर, वय : १३
रा.रुम नं.सी–२०९, पद्मावती अपार्टमेंट, प्लॉट नं.१८,
सेक्टर ७, एम एन आर शाळेजवळ, कामोठे,
नवी मुंबई–४१०२०९ — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे असे कळविण्यात येते की, कै. राजेंद्र रामचंद्र भोईनकर यांचे निधन दि.१२/०४/२०२१ रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर रेल्वे हॉस्पिटल, मुंबई येथे झाले आणि अर्जदार १) श्रीमती.कल्पना राजेंद्र भोईनकर, २) कुमार वेदांग राजेंद्र भोईनकर, रा.रुम नं.सी–२०९, पद्मावती अपार्टमेंट, प्लॉट नं.१८, सेक्टर ७, एम एन आर शाळेजवळ, कामोठे, नवी मुंबई–४१०२०९ यांनी या कोर्टात सदर मयत कै.राजेंद्र रामचंद्र भोईनकर यांच्या मालकीच्या खालील वर्णनाच्या मिळकतीचे वारस दाखला मिळवण्यासाठी अर्ज केलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**(स्थावर मिळकती) रुम नं.सी–२०९, पद्मावती अपार्टमेंट, प्लॉट नंबर–१८, सेक्टर–७, एम.एन.आर. शाळेजवळ, कामोठे, नवी मुंबई–४१०२०९.**
**(क्षेत्रफळ ३३.६५ चौरस मीटर कारपेट व ४०.३६ चौरस मीटर बिल्टअप)**

कै.राजेंद्र रामचंद्र भोईनकर यांच्या मृत्यूपश्चात अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत. सदर वारसाव्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत. सबब अर्जदार सदरचा वारस दाखला मिळण्यासाठी अर्ज करीत आहेत. सदर वारसा व्यतिरिक्त इतर कोणाच्याही हरकती असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास कोणत्याही हरकती नाहीत असे समजून अर्जदार यांस वारस दाखला देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.०२/०२/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/–** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — (कोर्टाचा शिक्का) — **सही/–** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

# मधुसूदन महादेव तथा मामा खरे यांचे निधन

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**



तालुक्यातील ख्यातनाम हॉटेल व्यावसायिक मधुसूदन महादेव तथा मामा खरे यांचे आज बुधवार, दि. ०२ फेब्रुवारी २०२२ रोजी दुपारी १ वाजता अल्पआजाराने निधन झाले. पोलादपूर शहरातील छ.शिवाजी महाराजांच्या पुतळयाच्या स्थापनेसाठी सद्गुरू दिगंबरदास वालावलकर चॅरिटेबल ट्रस्टमार्फत यशस्वी प्रयत्न करणाऱ्या मामा खरे यांनी आयुष्यभर अनेक लोकोपयोगी कामे केली आहेत.

या उपहारगृहामध्ये अनेक चित्रपट अभिनेते, गायक, राजकीय व्यक्ती, पत्रकार, उद्योगपती तसेच विचारवंतांनी आवर्जून भेट दिली असून अनेक कुटूंबियांनी या उपहारगृहातील नाष्टा आणि शाकाहारी पदार्थांचा आस्वाद घेण्यासाठी पिढयानपिढया या उपहारगृहाशी नाते जोडले आहे. यामुळे मधुसूदन महादेव तथा मामा खरे यांचे नांव कोकणासह पश्चिम महाराष्ट्रात सर्वदूर सर्वशृत झाले आहे. अनेक रूग्णांना डेरवण येथील वालावलकर ट्रस्टच्या रूग्णालयामध्ये उपचार करण्यासाठी मामा खरे यांच्या चिठ्ठीचा योग्य उपयोग होऊन प्राण वाचल्याचे प्रसंग सर्वज्ञात आहेत. गेल्या काही दिवसांपासून आजारी असलेल्या मामा खरे यांचे राहत्या घरी निधन झाल्याची दुखद बातमी समजताच पोलादपूरवासियांनी सायंकाळी दुकाने व व्यवसाय बंद ठेवून अंत्ययात्रेमध्ये सहभागी होऊन श्रध्दांजली वाहिली.

## जाहीर नोटीस

या नोटीसीने तमाम लोकांस कळविण्यात येते की, खालील वर्णनाची मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालक श्रीमती.लता शिवाजी देशमुख, श्री.संदीप शिवाजी देशमुख, सचिन शिवाजी देशमुख, ज्योती रवींद्र देशमुख सर्व रा.शेणगांव, ता.खालापूर, जिल्हा : रायगड यांचेकडून आमचे अशिलांनी रजिस्टर खरेदीखताने कायमस्वरुपी खरेदी घेण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे :–

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : शेणगांव, ता.खालापूर, जि.रायगड येथील शेतजमीन**

| कब्जेदाराचे नाव | गट नं. | एकूण क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| लता शिवाजी देशमुख व इतर ३ | ५७ | ०.१४.९ | ०.११ |

वर वर्णन केलेली मिळकत ही खरेदीखताने घेण्यासंबंधी आमचे अशिल आणि संबंधित जमीन मालक यांचेमध्ये बोलणी झाली आहे. सदरहू मिळकतीत विद्यमान मालकांव्यतिरिक्त अन्य कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, लिज, ताबा, वहिवाट वगैरे कोणताही कसलाही प्रकारचा प्रत्यक्ष हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून चौदा (१४) दिवसांचे आत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरुपात त्यांच्या हरकती खालील पत्यावर आणून द्याव्यात. सदर विहित मुदतीत कोणाचीही लेखी हरकत सकृतदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्यावर न आल्यास सदरहू मिळकती बाबत कोणाच्याही हरकती नाहीत व सदरहू मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल विद्यमान मालकांबरोबर खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही व ती हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

दि.०३/०२/२०२२

**सही/–**
**ॲड.प्रांजळ पुरुषोत्तम वाणी**
**बी.ई.(आयटी), एलएल.बी.,**
**खालापूर प्लाझा, गाळा क्र.२, खालापूर**
**तहसील कार्यालया समोर, मु.पो.**
**ता.खालापूर, जि.रायगड ४१०२०२**
**मो.नं.९५६१७३४१७१**

श्री.सोनवणे साहेब कोर्ट

अर्जदाराचे वकील
ॲड.रोहिदास ह. आगलावे

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.११२/२०२२
नि.नं.१०/ड
ने.ता.१५/०३/२०२२

१) श्री.बळीराम सिताराम म्हात्रे
वय : ५५ वर्षे, धंदा : शेती
रा.मु.खुटारी, तळोजे मजकूर,
ता.पनवेल, जि.रायगड, महाराष्ट्र ४१०२०८
२) श्री.बाळाराम सिताराम म्हात्रे
वय : ५१ वर्षे, धंदा : शेती
रा.मु.खुटारी, तळोजे मजकूर,
ता.पनवेल, जि.रायगड, महाराष्ट्र ४१०२०८
३) श्रीमती.मुक्ताबाई पांडुरंग गोंधळी
वय : ६५ वर्षे, धंदा : शेती
रा.गावदेवी मंदिरासमोर, घोट, पो.कोयनावेळे,
ता.पनवेल, जि.रायगड, महाराष्ट्र ४१०२०८
४) श्रीमती.धृपदाबाई उर्फ द्रोपदीबाई नामदेव म्हात्रे
वय : ४८ वर्षे, धंदा : शेती
रा.मु.पिसार्वे, तळोजे, पो.तळोजे ए.व्ही.,
ता.पनवेल, जि.रायगड, महाराष्ट्र ४१०२०८
५) श्रीमती.ठकाबाई तुळशीराम ठाकूर
वय : ५६ वर्षे, धंदा : शेती
रा.मु.पेठाली, तळोजे मजकूर,
ता.पनवेल, जि.रायगड, महाराष्ट्र ४१०२०८ — अर्जदार

विरुद्ध

१) श्री.किसन तुकाराम म्हात्रे
वय : सज्ञान, धंदा : शेती
रा.मु.खुटरारी, तळोजे मजकूर,
ता.पनवेल, जि.रायगड, महाराष्ट्र ४१०२०८ — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, कै.भिवा बापू म्हात्रे यांचे निधन खुटारी येथे दि.२३/१०/१९७७ रोजी झाले असून श्री.बळीराम सिताराम म्हात्रे वगैरे यांनी कै.भिवा बापू म्हात्रे यांच्या मालकीच्या खालील वर्णनाच्या मिळकतीचे वारस दाखला मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : रोहिंजण, ता.पनवेल, जि.रायगड येथील**

| गावाचे नाव | स.नं. | हि.नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| रोहिंजण | २९ | १/१ | १–११–२०<br>पो.ख. ०–१६–२८<br>एकूण १–२८–०० | १३.९८ |

कै.भिवा बापू म्हात्रे यांचे मृत्यूपश्चात अर्जदार हे व सामनेवाला हेच कायदेशीर वारस आहेत. सदर वारसांव्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत. सबब, अर्जदार सदरचा वारसदाखला मिळण्यासाठी अर्ज करीत आहेत. सदर वारसांच्या हक्काबद्दल इतर कोणाच्याही हरकती असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत या न्यायालयात सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास कोणत्याही हरकती नाहीत असे समजून अर्जदार यांस वारस दाखला देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.२/२/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/–** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — (कोर्टाचा शिक्का) — **सही/–** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू–२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई–४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल–४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स–२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा–पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## आदिवासी कुटुंब, विद्यार्थ्यांना जैन समाज संकेत ग्रुप मुंबई यांचा मदतीचा हात

**दै.रायगड नगरी । तळा**

सामाजिक बांधिलकीतून जैन समाज संकेत ग्रुप गोरेगाव मुंबई या संस्थेच्या वतीने तळा तालुक्यातील दुर्गम पाड्यातील चरई आदिवासी वाडी येथील १०० कुटुंबांना धान्य वाटप करण्यात आले त्याचबरोबर निराधार विधवा महिलांना आर्थिक मदत म्हणून प्रत्येकी एक हजार रुपये व ब्लँकेटचे वाटप केले.या संस्थेच्या वतीने येथील रजीप शाळेतील गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्य, खेळणी, रंगीत कपडे यांचे देखील वाटप करण्यात आले.

कोरोनाची झळ सर्वच स्तरातील नागरिकांना बसत आहे. तळा तालुक्यातील ग्रामीण भागालाही त्याची तीव्रता जाणवू लागली आहे. रोजंदारीवर काम करून पोट भरणाऱ्यांना याचा अधिक सामना करावा लागतो आहे.याचे भान ठेवत तत्परता दाखवून जैन समाज संकेत ग्रुप गोरेगाव मुंबई व समाजसेवक कृष्णा महाडिक यांच्या माध्यमातून चरई आदिवासीवाडी येथे सामाजिक उपक्रम राबविण्यात आला. यावेळी जैन समाज संकेत ग्रुप गोरेगाव मुंबईचे अतुलभाई शाह, भरतभाई अदानी, समाजसेवक कृष्णा महाडिक,शाळेच्या मुख्याध्यापीका कल्याणी वाजे गायकर, दुधाळ सर, लाड सर, ढोले सर, व्यवस्थापक समिती अध्यक्ष संजय हीलम, गावचे अध्यक्ष गणपत कोळी, उपाध्यक्ष श्रावण जाधव, चंद्रकांत हीलम ग्रामस्थ,महिला मंडळ, शाळेतील विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी जैन समाज संकेत ग्रुप गोरेगाव मुंबईचे अतुलभाई शाह, भरतभाई अदानी, समाजसेवक कृष्णा महाडिक यांनी उपस्थित राहून आपला सहभाग दर्शवला आहे. तसेच कोरोना रोगाबद्दल जनजागृती करून घ्यावयाच्या काळजी याबाबत जनजागृतीही त्यांनी केली व आदिवासी बांधवांना आर्थिक मदत, धान्य वाटप शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप केले त्यांच्या या सामाजिक बांधीलकीचे कौतुक करण्यात येत आहे.

### जाहीर नोटीस

सदर जाहीर नोटीसीद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, सिडको संचिका क्र.२९७ प्रमाणे मौजे : तळोजे (पाचनंद) नोड येथे सेक्टर क्र.१४, भूखंड क्र.४८, क्षेत्र ४० चौ.मी. क्षेत्रफळाचा भूखंड हा श्री.राजेंद्र गंगाराम दळवी व श्रीमती.रुचीरा राजेंद्र दळवी रा.फ्लॅट नं.१०१, वसंत विहार, महात्मा फुले, वागळे इस्टेट ठाणे यांच्या मालकीची व ताबे कब्जातील भूखंड आहे.

श्री.राजेंद्र गंगाराम दळवी व श्रीमती.रुचीरा राजेंद्र दळवी यांनी त्यांचे मालकीचा मौजे : तळोजे (पाचनंद) नोड येथे सेक्टर क्र.१४, भूखंड क्र.४८, क्षेत्र ४० चौ.मी. क्षेत्रफळाचा भूखंड हा सौ.पौर्णिमा शरद सावंत, रा.ए–विंग ६०१, नीलम हाइट्स, प्लॉट क्र.१३९, सेक्टर १३, खारघर, नवी मुंबई यांस कायमस्वरुपी विक्री करण्यात आलेला आहे. सदर भूखंडाबाबत सिडको कार्यालयात त्रिपक्षीय कराराने हस्तांतरीत करण्यात येणार आहे. तरी कोणतीही व्यक्ती किंवा अनेक व्यक्ती, कंपनी कार्यालय यांचा सदर मिळकतीसंबंधी किंवा त्यावर किंवा त्याच्या भागावर, विक्री, गहाणवट, लिन, भेट किंवा अन्य कोणत्याही प्रकारे हक्क असेल तर त्याच्या पृष्ट्यर्थ त्यांनी अशा हक्काबाबत/हरकतीबाबतची सुचना त्यात हक्क/हरकतीचे स्वरुप याची माहिती अन्य तपशिलासह की जी पुरावा म्हणून पुरेशी ठरेल तसेच कागदोपत्री पुराव्याने (वकील) मारिया कोळी खालील सही करणार यांसकडे त्याच्या कार्यालयात ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत सादर करावी आणि जर तसे केले नाही तर असे गृहीत धरण्यात येईल की सदरहू मिळकत ही सर्व प्रकारच्या बंधनातून आणि अन्य हक्कांपासून आणि अधिकारांपासून किंवा अन्य प्रकारच्या हक्काच्या बंधनापासून मुक्त आहे आणि तसे जर काही हक्क असतील तर ते सोडून देण्यात आले आहेत असे मानण्यात येईल आणि श्री.राजेंद्र गंगाराम दळवी व श्रीमती.रुचीरा राजेंद्र दळवी हे सदर भूखंडाबाबत सिडकोसोबत त्रिपक्षीय कराराने आपल्या नावे करण्यात येईल याची नोंद घ्यावी व त्यानंतर आलेल्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणर नाही व सदर मिळकत ही बोजारहीत असेल असे मानण्यात येईल.

दि.०२/०२/२०२२

**सही/–**
**ॲड.मारिया कोळी**
**१ मजला, श्री प्रेरणा अर्पा.**
**उरण, ता.उरण, जि.रायगड**
**मो.नं.९७०२२०९११४**

श्री.सोनवणे साहेब कोर्ट

अर्जदाराचे वकील
ॲड.मेहबुब गै. पटेल
ॲड.मनोज म्हात्रे

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज क्र.१९९०/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.०४/०३/२०२२

१) श्री.संजय यशवंत कांडपिळे
वय : ६३ वर्षे, धंदा : व्यवसाय
रा.मातृपितृ छाया, पोदी नं.१, एस.पी.मोरे कॉलेजजवळ,
सेक्टर १५, नवीन पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड
२) श्री.अजय यशवंत कांडपिळे
वय : ६० वर्षे, धंदा : व्यवसाय
रा.पर्ल होम्स बिल्डींग, प्लॉट नं.४१३,
के मॉल जवळ, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड अर्जदार

या जाहीर नोटीसीद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येत आहे की, अर्जदार नं.१ व २ यांचे वडील कै.यशवंत गंगाराम कांडपिळे हे दि.३०/०५/२०१७ रोजी मयत झाले असून कै.यशवंत गंगाराम कांडपिळे यांच्या नावे युनियन बँक ऑफ इंडिया, पनवेल शाखा येथे मुदत ठेवीमध्ये रक्कम असून सदर मुदत ठेवीमधील रक्कमेचा तपशिल खालीलप्रमाणे :–

**रक्कमेचे वर्णन**

| खाते धारकाचे नांव | बँकेचे नाव व शाखा | खाते नंबर/ रिसीट नं. | मुदत ठेव |
|---|---|---|---|
| कै.यशवंत गंगाराम कांडपिळे | युनियन बँक ऑफ इंडिया, पनवेल | १६८८ ३०२०१४०८८२ | १९५७२/– |
| | | ४५४४ ३०३१४१९२० | ११५६९८/– |
| | | ४५४४ ३०३०१४१९२२ | ११५६९८/– |
| | | एकूण | २,५०,९६८/– |

येणेप्रमाणे वर नमूद मुदत ठेवींच्या अनुषंगाने कै.यशवंत गंगाराम कांडपिळे यांचा इंडियन सक्सेशन ॲक्ट १९२५ चे कलम ३७२ प्रमाणे वारस दाखला (सक्सेशन सर्टीफिकेट) मिळणेकरिता अर्जदार यांना या मे.कोर्टात अर्ज दाखल केला आहे.

वरील अर्जदार हे कै.यशवंत गंगाराम कांडपिळे यांचे कायदेशीर वारसदार आहेत असे अर्जदारांचे म्हणणे आहे. अर्जदारांचे हक्काबद्दल कोणासही हरकत घ्यावयाची असल्यास अथवा वारसदाखला देण्यास कोणतीही हरकत असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून १ महिन्याचे आत या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकत घेण्याची आहे. जर या कालावधीमध्ये कोणीही योग्य हरकती घेतल्या नाहीत तर मे.कोर्ट अर्जदार यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि अर्जदार जर कै.यशवंत गंगाराम कांडपिळे यांचे वारसपत्रास हक्कवार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना वारसपत्र मंजूर करेल.

आज दि.२/२/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व मे.कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/–** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/–** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

# युवकांनी नोकरदार होण्यापेक्षा उद्योजक होण्यासाठी प्रयत्न करावेत : विजय तळेकर

**दै.रायगड नगरी । पनवेल**

अनेक उच्चशिक्षित तरूणांना काही कारणास्तव नोकरी मिळत नसल्याने समाजातील अनेक तरुण–तरुणी बेरोजगार आहेत. त्यामुळे तरुणांनी नोकरी करणाऱ्यांऐवजी नोकरी देणारे बनले पाहिजे. युवकांनी नोकरदार होण्यापेक्षा उद्योजक होण्यासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन पनवेलचे विजय तळेकर यांनी केले. ते आज (बुधवार दि.२ फेब्रुवारी) पनवेल तहसीलदार कार्यालयात आयोजित केलेल्या पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रमात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना बोलत होते. यावेळी उपस्थित विद्यार्थ्यांना स्वयंरोजगार विषयक व शासनाच्या विविध योजनांची माहिती देण्यासाठी जिल्हा उद्योग केंद्राचे जनरल मॅनेजर जी एस हरलिया, जिल्हा लीड बँकेचे मॅनेजर विजयकुमार सूर्यवंशी, जिल्हा खादी ग्रामोद्योग अधिकारी नित्यानंद पाटील, महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्राचे प्रकल्प अधिकारी प्रदीप सावंत यांच्यासह आदी मान्यवर उपस्थित होते.



रायगडचे जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या संकल्पनेतून प्रत्येक महसूल उपविभागीय स्तरावर पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रमांतर्गत तरुणांसाठी स्वयंरोजगार मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाची सुरुवात आजपासून पनवेल तहसीलदार कार्यालयात तहसीलदार विजय तळेकर यांच्या माध्यमातून करण्यात आली. रोजगारविषयक शासनाच्या विविध योजना आहेत. औद्योगिक, अभियांत्रिकी, विविध तंत्रशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसह इतर नागरिकांनाही शासनाच्या विविध योजनांची माहिती यावेळी देण्यात आली.

राज्यातील युवक/युवतींच्या सर्जनशीलतेला वाव मिळून राज्यात स्वयंरोजगारास पूरक वातावरण तयार करणे, त्याद्वारे राज्यात ग्रामीण तसेच शहरी क्षेत्रात सूक्ष्म, लघु उपक्रमांद्वारे व्यापक रोजगाराच्या संधी निर्माण होण्यासाठी शासनाच्या आर्थिक सहाय्यातून प्रकल्प उभारणीस हातभार लावणे, सुशिक्षित बेरोजगारांना स्वयंरोजगाराची संधी उपलब्ध करून देणे, पारंपारिक कारागिरांना एकत्रित करून स्थानिक पातळीवर स्वयंरोजगाराची संधी उपलब्ध करून देणे, शहराकडे येणाऱ्या बेरोजगार युवकांचे व पारंपारिक कारागिरांचे स्थलांतर थांबविणे, ग्रामीण भागातील रोजगार वाढीस मदत करणे, या उद्देशाने मार्गदर्शन करण्यासाठी सदर शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

# सह्याद्री प्रतिष्ठानकडून किल्ले गुमतारावर संवर्धन कार्याचा ओघ सुरूच

**दै.रायगड नगरी । कर्जत**

सह्याद्री प्रतिष्ठान हि संस्था महाराष्ट्रातील गडकिल्ले संवर्धनाचे कार्य गेल्या १४ वर्षापासून करत आहे. संस्थेची स्थापना श्रमिक गोजमगुंडे यांनी केली आहे.

संस्थेचे कार्याध्यक्ष आ.संजय केळकर यांच्या मार्गदर्शनाने महाराष्ट्रातील दुर्गसेवकांना गडकोट संवर्धन जनजागृतीसह संवर्धन मार्गदर्शन होत आहे. संस्थेमार्फत आजवर तटबंदी बुरुज बांधकामासोबत गडकिल्लयांवर लोकवर्गणीतून सागवानी प्रवेशद्वार आणि तोफगाडे बसविण्यासोबत विविध सामाजिक कार्य मोठ्या प्रमाणवर होत आहेत. ठाणे जिल्ह्यातील भिवंडी तालुक्यात मध्ये असणारा किल्ले गुमतारा येथे संस्थे मार्फत सन २०१५ पासून दुर्गसंवर्धन कार्य सुरु आहे. किल्ल्याच्या वाटा शोधणे दिशा दर्शक, सूचना फलक व स्थळ दर्शक लावणे या कामांसोबत टाके स्वच्छत,प्रवेशद्वार जवळील निसरड्या वाटेची दुरुस्ती करणे,नैसर्गिक जलस्त्रोत्र ट्रेकर पर्यंत पोहचविणे इत्यादी कामे स्थानिक ग्रामस्थ आणि वनविभागाच्या हा किल्लासहकार्याने नियमित स्वरुपात सुरु आहेत. गडाचे बांधकाम मध्ययुगीन कालखंडातीलअसून घनदाट जंगलात वनदुर्ग या प्रकारत मोडतो गडावरील तटबंदी बुरुज ढासळलेले असून सद्य स्थितीत जे आहेत ते जतन करण्याचे कार्य संस्थेकडून होत आहे. अशी माहिती भिवंडी विभाग सदस्य अक्षय पाटील व सागर पाटील यांनी दिली. नुकतीच सह्याद्री प्रतिष्ठानच्या ठाणे व भिवंडी विभागअंतर्गत संवर्धन मोहिमेचे आयोजन करण्यात आले. या मोहिमेत किल्ल्यावरील झुडपांनी व मातीने बुजलेले पाण्याचे टाके, तटबंदी बुरुजावरील अतिरिक्त झुडपे काढून महादरवाजातील दगड उचलून पायवाट दुरुस्त करण्यात आली. असे ठाणे विभाग सदस्य रोशन मोरे यांनी सांगितले.

गुमतारा तसेच ठाणे जिल्ह्यातील गडकोटांवर संस्थे मार्फत मोठ्या प्रमाणत संवर्धन कार्य सुरु असून जिल्ह्यातील शिवप्रेमींनी या कार्यत सहभागी व्हावे असे आव्हान ठाणे विभाग अध्यक्ष महेश वीरणेकर यांनी केले. या मोहिमेत सुयोग जगे, तुषार धुधाले, महेश माने, अक्षय तटकरे, रोशन पाटील, साईनाथ भेरे, योगेश पाटील, भावेश ढेसले, दयानंद डोंगरे, रोहित जाधव, मयूर चौधरी सह



शहापूर, मुरबाड आणि मुंबई विभाग या विभागांची उपस्थिती लाभली.

इतिहास– किल्ल्यास घोटवड, दुगाड, गोतारा व गुमतारा यांना नावाने संबोधले जाते. किल्ल्यावरील पाण्याच्या टाक्यांच्या बांधकामावरून हा किल्ला प्राचीन व मध्ययुगीन कालखंडाची साक्ष देत आहे. किल्ल्याच्या परिसराचा उल्लेख इ.स.१६८९मध्ये आढळतो. छत्रपती संभाजी महाराज पकडले गेल्याचे समजताच मुघल सुभेदार मात्तबरखान नाशिक कडून माहुलीवर चालून गेला. दोन तीन महिन्यात नाना युक्त्या करून माहुली,भिवंडी,दुगाड आणि कल्याण हि ठाणी कब्जात आणली. वसई मोहिमेवर पेशव्यांनी पाठविलेली फौज माहुलीच्या रानात दाब्यास बसली होती. २४ मार्च १७३७ रोजी ती फौज घोटवड रानात आली होती. पाण्याच्या मारामारीमुळे दोनचार सैनिक मृत्य पावले होते. पुढे या सैन्यांनी तुंगार पासून राजवली येथे मुक्काम करून वसई मोहिमेतील पहिला मोर्चा बहाद्दरपुरा येथे लावला.किल्या पायथ्याशी असलेल्या दुगाड येथे दि.१२ ते १ डिसेंबर १७८० मध्ये कर्नल हर्टेल यांच्या सोबत झालेल्या लढाईत मराठा सरदार रामचंद्र गणेश हरी यांना वीरमरण आले. इ.स.१८१८ मध्ये इंग्रजांनी या किल्याचा पूर्ण ताबा घेतला. हा किल्ला १९९४फुट / (५८५ मीटर) एवढ्या उंचीवर असून प्रसिद्ध वज्रेश्वरीदेवी मंदिरापासून ४ किमी अंतरावर आहे. संदर्भ – भारतीय इतिहास आणि संस्कुती त्रैमासिक २०१६ – (संशोधन लेख गणेश रघुवीर) संदेश भोईर सह्यद्री प्रतिष्ठान भिवंडी विभाग यांनी दिला आहे.

# वाकण पोलिस चौकीचे रस्ते सुरक्षा अभियान

**दै.रायगड नगरी । वाकण**

संपुर्ण महाराष्ट्रात रस्ते सुरक्षा अभियान राबविण्यात येत असतानाच याचाच एक भाग म्हणून रायगड पोलिस दलाच्या वाहतूक शाखेतर्फे जिल्हा वाहतूक शाखेच्या नागोठणे व वाकण येथील वाहतूक पोलिस मदत केंद्रामार्फत नागोठणे व वाकण येथील मिनिडोर चालक व रिक्षा चालकांसाठी वाहतूक पोलिसांचा एकच ध्यास... सर्वांचा होवो सुरक्षित प्रवास या उद्देशातून मंगळवार दि. १ फेब्रुवारी रोजी जनजागृतीपर कार्यक्रम राबविण्यात आला.

रायगड जिल्हा पोलिस अधिक्षक अशोक दुधे व अप्पर पोलिस अधिक्षक अतुल झेंडे यांच्या आदेशाने आणि रायगड वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक राजेंद्र पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आलेल्या या जनजागृतीपर कार्यक्रमात नागोठण्यातील छत्रपती शिवाजी चौक परिसर, दोन्ही मिनिडोर स्थानक तसेच वाकण नाक्यावरील मिनिडोर व रिक्षा चालक तसेच मालकांध्ये सुरक्षित रस्ते वाहतूक, वाहतूक नियमावली, वाहतूक दंड आकारणी नियमावली याविषयी जनजागृती करण्यात आली. हा रस्ते सुरक्षा अभियानाचा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी वाहतूक शाखेचे पो.ह. रमेश पाटील, पो.ह. अमोल नलावडे, पो. ना. राजेंद्र गाणार, पो.ना. मनोहर माळी, पो.ना. राजू पाटील, पो.ना.हेमंत कुथे व पोलिस शिपाई प्रवीण शिर्के आदिंनी मेहनत घेतली.



# पनवेलमधून तीन मुलांसह विवाहिता बेपत्ता

**दै.रायगड नगरी । पनवेल**

आपल्या तीन मुलांसह एक विवाहिता बेपत्ता झाल्याने ती हरविल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

करंजाडे गाव येथील श्री गणेश कृपा बिल्डींगमध्ये राहणारे सतीशकुमार गौंड यांची पत्नी नंदिनीदेवी (२५) रंग गोरा, चेहरा उभट, उंची ५ फूट, अंगाने सडपातळ, केस काळे लांब, डोळे घारे, डाव्या हातावर एस आणि एन असे गोंदलेले आहे. तीला भोजपुरी भाषा अवगत असून, तिच्या अंगात पंजाबी ड्रेस, पायात चप्पल सोबत तीन मुले त्यातील मोठा मुलगा समर वय वर्षे ९ रंग सावळा, चेहरा गोल, उंची ४ फूट, अंगाने सडपातळ, अंगात पॅन्ट शर्ट घातलेला आहे. मुलगी परी वय ६ वर्षे अंगाने मध्यम, रंग गोरा, चेहरा उभट, उंची ३ फुट, केस काळे, डोळे घारे, अंगात फ्रॉक घातलेला आहे व मुलगा अंश वय ३ वर्षे, रंग गोरा चेहरा गोल, उंची २.५ फुट, अंगाने सडपातळ, केस काळे, डोळे काळे, दोन्ही हातात चांदीचे कडे असून अंगात हाफ पॅन्ट व शर्ट घातलेला आहे.

मा.गोडसे साहेब कोर्ट

ॲड.रजनी गोवारी

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मा.दिवाणी न्यायाधिश साहेब (व.स्तर) यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज क्र.२०२५/२०२१
नि.नं.७/ड
ने.ता.१०/०३/२०२२

श्री.अलोक भुषण महापात्रा (मयत) तर्फे वारस पत्नी
श्रीमती.मीरा महापात्रा
उ.व. ६३, धंदा : घरकाम
प्लॅट नं.ई १६३, रघुनाथ विहार आर्मी को.ऑ.सोसा.लि.,
प्लॉट नं.१, सेक्टर १४, खारघर, ता.पनवेल,
जि.रायगड ४१०२१० अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, कै.अलोक भुषण महापात्रा यांचे दि.२९/११/२०१९ रोजी निधन झाले आहे. यांचे मालकीचे व ताबेकब्जातील प्लॅट नं.ई १६३, रघुनाथ विहार आर्मी को. ऑ.सोसा.लि., प्लॉट नं.१, सेक्टर १४, खारघर, ता.पनवेल, जि.रायगड ४१०२१०, क्षेत्रफळ १११० चौ.फुट बिल्टअप एरिया व कार पार्कीग नं. सीपी/ई–१८, क्षेत्रफळ–१६१.९३ चौ.फूट येथील खालील वर्णनाच्या मिळकतीसंदर्भात प्रोबेट सर्टीफिकेट मिळणेकरिता अर्जदार यांनी अर्ज दाखल केलेला आहे. सदर मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे :–

**मिळकतीचे वर्णन**
**मु.खारघर, ता.पनवेल, जि.रायगड**

| अ.क्र. | मिळकत | वर्णन |
|---|---|---|
| १ | निवासी सदनिका | फ्लॅट नं.ई १६३, रघुनाथ विहार आर्मी को.ऑ. सोसा.लि, प्लॉट नं.१, सेक्टर १४, खारघर, ता.पनवेल, जि.रायगड ४१०२१०, क्षेत्रफळ–१११० चौ.फूट बिल्टअप एरिया व कार पार्कीग नं.सीपी/ई–१८ क्षेत्रफळ–१६१.९३ चौ.फूट |

२) मयत श्री.अलोक भुषण महापात्रा यांच्या मालकीची वर वर्णन केलेली मिळकत व मृत्यूपूर्वी व मृत्यूनंतर जी त्यांना मिळू शकली असती अशा सर्व मिळकती.

वर वर्णन करण्यात आलेली मिळकत ही कै.अलोक भुषण महापात्रा यांचे मालकीची व ताबेकब्जातील आहेत. कै.अलोक भुषण महापात्रा यांचे नावे असलेली मिळकत ही अर्जदार यांचे नावे होण्याठी अर्जदार यांनी प्रोबेट सर्टीफिकेट मिळणेकरिता या मे.कोर्टात अर्ज दाखल केलेला आहे. कै.अलोक भुषण महापात्रा यांना अर्जदार हेच सदर मिळकतीसंदर्भात मृत्यूपत्रानुसार कायदेशीर वारस आहेत. त्यांचे या हक्काबाबत कोणाही व्यक्तीस काही हरकत, आक्षेप असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत या मा.न्यायालयात प्रत्यक्ष हजर राहून, आपल्या हरकती व आक्षेप दाखल कराव्यात. याप्रमाणे दिलेल्या कालावधीमध्ये योग्यरितीने हरकती न घेतल्यास हे मा.न्यायालय श्रीमती.मीरा महापात्रा हे कै.अलोक भुषण महापात्रा यांचे मृत्यूपत्रानुसार कायदेशीर वारस असल्याबाबतचा प्रोबेट सर्टीफिकेट सदर मिळकतीसंदर्भात देईल, याची नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आज दि.२/२/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/–** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/–** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

श्री.सोनवणे साहेब

ॲड.विक्रम पाटील

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात

रे.मु.नं.१५६/२०२०
ने.ता.१७/०३/२०२२

१) श्री.सुनिल सुकीर मोरे
वय : ४४ वर्षे, धंदा : शेती
२) श्री.धर्मनाथ सुकीर मोरे
वय : ३७ वर्षे, धंदा : शेती
३) श्री.वाल्मिक सुकीर मोरे
वय : ३४ वर्षे, धंदा : शेती
क्र.१ ते ३ रा.एम.आय.डी.सी. रोड,
विठ्ठल मंदिरा शेजारी, मु.पेंधर, ता.पनवेल, जि.रायगड
४) श्रीमती.अपर्णा निलेश वर्तक
वय : २९ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.रांजणकर, नारंगी, ता.अलिबाग, जि.रायगड
४) श्रीमती.अश्विनी सुकांत पाटील
वय : २९ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.माणकुळे, हशिवरे, ता.अलिबाग, जि.रायगड वादी

विरुद्ध

मा.जिल्हाधिकारी साहेब
रायगड, अलिबाग

सर्व जनतेस सदर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, कै.सुकीर चंदर मोरे हे दि.१३/०६/१९९६ रोजी मु.पेंधर या गावातून राहत्या घरातून अचानक बाहेर गेले होते. तेव्हापासून सदर इसम आज पर्यंत कोठेही आढळून आलेले नाही. कै.सुकीर चंदर मोरे यांच्या पत्नी कै.सावित्रीबाई सुकीर मोरे यांनी १४/०४/१९९६ रोजी मे.वरिष्ठ पोलीस निरीक्षक तळोजा पोलीस स्टेशन यांच्याकडे मिसिंग रजिस्टर नं.१६/१९९६ द्वारे तक्रार केली होती. परंतु त्या तक्रारी नंतर देखील पोलिसांनी तपास करून सुद्धा सदर व्यक्ती कोठेही आढळून आलेला नाही. त्यानंतर काही वर्षानी कै.सावित्रीबाई सुकीर मोरे ह्या दि.०१/०३/२०१६ रोजी मयत झाल्या आहेत.

कै.सुकीर चंदर मोरे यांच्या नावे सामाईक मिळकत आहे ती पुढीलप्रमाणे.

**मौजे : पेंधर, ता.पनवेल, जि.रायगड**

| युनिट केस नं. | सर्व्हे नं./हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| १०१ | १४४/१ | ०–५७–०७ | ९.१२ |
| १०१ | १४६/३ | ०–१३–०७ | ०.८४ |
| १०१ | १४६/६ | ०–१८–०७ | २.५६ |
| १०१ | १३८/१ | ०–०३–०० | ०.०८ |

कै.सुकीर चंदर मोरे हे जवळ–जवळ २५–२६ वर्षे पासून बेपत्ता असल्यामुळे त्याचे कायदेशीर वारसांनी दिवाणी न्यायालयात सुकीर चंदर मोरे मयत झाले असे घोषित करण्यासाठी रेगुलर मुकदमा नंबर १५६/२०२० असा दाखल केलेला आहे.

तरी सुकीर मोरे हे मयत नाही किंवा कोणाला कोठे आढळल्यास किंवा कोणाची काही हरकत असल्यास ३० दिवसाच्या आत मे.दिवाणी न्यायालय पनवेल येथे हरकत द्यावी तसे न केल्यास मे.न्यायालय सुकीर चंदर मोरे मयत असल्याचे जाहीर करतील व त्यानंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

**सही/–** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/–** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

मा.गोडसे सो

अर्जदारातर्फे वकील
विवेक सदाशिव तावडे

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांच्या कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.२०२९/२०२१
नि.नं.७/ड
ने.ता.१०/०३/२०२२

१) श्रीमती.पार्वती बळवंत जाधव, वय : ५२
रा.बी/३१२, पद्मावती को.ऑ.हौ.सो.लि.,
प्लॉट नं.१८, सेक्टर ७, कामोठे–४१०२०९
२) सौ.जयश्री विनोद पवार, वय : ३०
रा.४०१, ओंकार बिल्डींग, प्लॉट नं.१२,
सेक्टर १२, पनवेल–४१०२०६
३) अनुराधा बळवंत जाधव, वय : २८
रा.पार्वती निवास, शिरसवाडी रोड,
दत्त मंदिर पाठीमागे, गुरसाळे, तालुका : खटाव,
जिल्हा : सातारा, महाराष्ट्र–४१५५०६
४) हरिश्चंद्र बळवंत जाधव, वय : २६
रा.बी/३१२, पद्मावती को.ऑ.हौ.सो.लि.,
प्लॉट नं.१८, सेक्टर ७, कामोठे–४१०२०९
५) सौ.ताई शंकर जाधव, वय : ७२
रा.कुंभारकी, गुरसाळे, तालुका : खटाव,
जिल्हा : सातारा, महाराष्ट्र–४१५५०६ अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे असे कळविण्यात येते की, कै.बळवंत शंकर जाधव यांचा मृत्यू दि.२९/११/२०२१ रोजी गुरसाळे, तालुका : खटाव, जिल्हा : सातारा येथे झालेला असून १) श्रीमती.पार्वती बळवंत जाधव, वय : ५२, रा. रा.बी/३१२, पद्मावती को.ऑ.हौ.सो.लि., प्लॉट नं.१८, सेक्टर ७, कामोठे–४१०२०९, २) सौ.जयश्री विनोद पवार वय : ३०, रा. रा.४०१, ओंकार बिल्डींग, प्लॉट नं.१२, सेक्टर १२, पनवेल–४१०२०६, ३) अनुराधा बळवंत जाधव, वय : २८, रा.पार्वती निवास, शिरसवाडी रोड, दत्त मंदिर पाठीमागे, गुरसाळे, तालुका : खटाव, ४) हरिश्चंद्र बळवंत जाधव, वय : २६, रा.बी/३१२, पद्मावती को.ऑ.हौ.सो.लि., प्लॉट नं.१८, सेक्टर ७, कामोठे–४१०२०९, ५) सौ.ताई शंकर जाधव, वय : ७२, रा.कुंभारकी, गुरसाळे, तालुका : खटाव, जिल्हा : सातारा, महाराष्ट्र–४१५५०६ यांनी कै.बळवंत शंकर जाधव यांच्या मालकीच्या खालील वर्णनाच्या मिळकतीचे वारस दाखला मिळवण्यासाठी अर्ज केलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**पनवेल महानगरपालिकेच्या हद्दीतील (क्षेत्रफळ २९.६१ चौ.मी. बिल्टअप) बी/३१२, पद्मावती को.ऑ.हौ.सो.लि., प्लॉट–१८, सेक्टर–७, कामोठे–४१०२०९ अशा वर्णनाची मिळकत**

कै.बळवंत शंकर जाधव यांच्या मृत्यूपश्चात अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत. सदर वारसाव्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत. सबब अर्जदार सदरचा वारस दाखला मिळण्यासाठी अर्ज करीत आहेत. सदर वारसा व्यतिरिक्त इतर कोणाच्याही हरकती असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास कोणत्याही हरकती नाहीत असे समजून अर्जदार यांस वारस दाखला देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.०२/०२/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/–** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/–** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

# संक्षिप्त...

## श्रमिक विद्यालय येथे विद्यार्थी वर्गाला करिअर मार्गदर्शन

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

नवजीवन शिक्षण प्रसारक मंडळ खांब ,ता.रोहे या शिक्षण संस्थेच्या श्रमिक विद्यालय चिन्हे येथे इ.दहावी विद्यार्थी वर्गाला करिअर मार्गदर्शनपर कार्यक्रम ता.१ रोजी यशस्वीपणे संपन्न करण्यात आला. यावेळी मुख्याध्यापक दिपक जगताप, नरेंद्र माळी,अमोगसिद्ध सुरवसे व तज्ञ मार्गदर्शक,पुरूषोत्तम जाडकर,प्रदीप क्षीरसागर व भिमेश भेकरे उपस्थित होते.

या कार्यक्रम अंतर्गत इ.दहावी नंतर नक्की काय असा प्रश्न विद्यार्थी वर्गाला पडतो,अशा परिस्थितीत विद्यार्थी वर्गाने विचलित न होता आपाल्याला ज्या क्षेत्रात करिअर करायचं आहे ते मनावर पक्कं बिबवून त्या दिशेने वाटचाल केली असता आपला मार्ग सुकर होतो.याशिवाय कॉलेज जीवनात प्रवेश केल्यावर कला, विज्ञान व कॉमर्स या तिन्ही शाखांमध्ये आपल्याला नक्की कशाप्रकारे शिक्षण मिळते.व त्याचा भावी जीवनात कितपत फायदा होतो याबाबत शेवटी तज्ञांनी सांगितले.

तज्ञ मार्गदर्शक पुरूषोत्तम जाडकर,प्रदीप क्षीरसागर व भिमेश भेकरे यांनी विद्यार्थी वर्गाला केलेल्या बहुमोल मार्गदर्शनाबद्दल मुख्याध्यापक दिपक जगताप यांनी आभार व्यक्त करून या कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## चिंचवाडी रोहा येथे श्री गणेश जयंती उत्सव

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

रोहा तालुक्यातील चिंचवाडी येथे या वर्षीही गणेश जयंती उत्सव ४/०२/२०२१ रोजी साजरा होत आहे.


या निमित्त सकाळी ९ ते ११ श्रींचे अभिषेक व पूजा सकाळी ११ महाआरती दुपारी १२ ते २ सांप्रदायिक भजन मंडळी जाधववाडी यांचे भजन दु ३ ते सायं ५ वाजता सत्यनारायणाची महापूजा सायं ५ ते ७ महिलांसाठी हळदी कुंकू व लेझीम नृत्य ७ ते रात्री ९ वा महाप्रसाद पाहुण्यांचे स्वागत व आभारप्रदर्शन रात्री ९ . ३० कीर्तन व जागर अ ब प तुकाराम महाराज कळंबे आळंदी यांचे कीर्तन मंडळी वाली पंचक्रोशी या कार्यक्रमास सहकुटुंब सहपरिवार मित्रमंडळींसह उपस्थित पाहून तीर्थप्रसाद व महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे विनम्र चिंचवाडी ग्रामस्थ मुंबईकर व महिलामंडळ यांनी केला आहे .

# वीजचोरी प्रकरणी दंड ठोकल्याची माहिती देण्यास कर्जत महावितरण उप कार्यकारी अभियंताचा नकार

**दै.रायगड नगरी । खलील सुर्वे**

**खोपोली** : महावितरण कर्मचारी व अधिकाऱ्यांच्या नाकावर टिच्चून नवीन रेल्वे स्टेशनचे काम करणाऱ्या ठेकेदारांकडून मागील तीन महिन्यांपासून वीज चोरी करण्यात येत होती, याबाबत अखिल भारत जर्नालिस्ट फेडरेशनने आवाज उठविल्यानंतर झोपलेले महावितरण विभाग जागे झाले, पण थातूर-मातूर कारवाई करून वेळ मारून नेत असल्याचे दिसून येत आहे.



महावितरण उप कार्यकारी अभियंता प्रकाश बळवंत देवके यांच्याकडून वीजचोरी करणाऱ्या ठेकेदाराला वीजचोरी प्रकरणी किती दंड वसूल करण्यात आला? याबाबत माहिती पत्रकारांनी मागितली असता, दंड केल्याची माहिती देण्यास नकार देण्यासोबतच नवीन रेल्वे स्टेशनचे काम करणारा ठेकेदार डिझेल पंपच्या सहाय्याने तिथे काम करीत असल्याचे त्यांनी सांगितले.

गेली तीन महिने वीजचोरी आकडा टाकून २००-३०० मीटर वायर टाकून वीजचोरी होत असल्याची माहिती महावितरण उप कार्यकारी अभियंता प्रकाश बळवंत देवके यांना झाली नाही, पण वीज चोरांवर कारवाई करण्याची वेळ आल्यावर त्या ठिकाणी डिझेल पंपच्या सहाय्याने काम होत असल्याचे त्यांना दिसून आले. चोरीची माहिती नसणाऱ्या उप कार्यकारी अभियंता प्रकाश बळवंत देवके यांना मात्र त्याठिकाणी डिझेल पंप असल्याचे कसे समजते? तीन महिने वीज चोरी न करता ठेकेदार डिझेल पंपने काम करीत होता, हे उप-अभियंतांना कसे समजते, असा प्रश्न निर्माण झाला आहे. नवीन रेल्वे स्टेशनचे काम करणारा ठेकेदार मागील तीन महिन्यांपासून वीज चोरी करीत असल्याचा भंडाफोड अखिल भारत जर्नालिस्ट फेडरेशन व 'दैनिक रायगड नगरी 'ने केल्यानंतर महावितरणकडून घटनास्थळी पाहणी करून दंड ठोकण्यात आला, पण ठेकेदाराला किती दंड आकारण्यात आला, याची माहिती पत्रकारांना देण्यास उप कार्यकारी अभियंता प्रकाश बळवंत देवके यांनी नकार दिला. उप कार्यकारी अभियंता देवके म्हणाले की, माहितीच्या अधिकारात अर्ज करा, मला वाटले तरच माहिती देईल. पत्रकारांना दंड केल्याची माहिती देण्यास बांधिल नाही, आम्हाला काय दंड आकारचा होता, तो दंड आकारला आहे, पण दंडाचा आकडा सांगू शकत नाही आणि ठेकेदार डिझेल पंपने काम करीत असल्याचेही सांगितले.

दरम्यान, सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार रेल्वे स्टेशनचे काम करणाऱ्या ठेकेदाराला फक्त ९ हजार रूपये दंड आकारण्यात आल्याचे समजते. तीन महिने दिवसरात्रं विजेचे काम करणाऱ्या ठेकेदाराला फक्त ९ हजार रूपये दंड कसा? असा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे कर्जत महावितरण अधिकारी व कर्मचारी खरंच महामंडळ व शासनाचे काम करीत आहेत की, ठेकेदाराला वाचविण्याचे? अशी चर्चा सुरू होती. तीन महिने झोपले होते उप कार्यकारी अभियंता प्रकाश देवके? :- वीजचोर ठेकेदाराला दंड आकारल्याची माहिती देण्यास टाळाटाळ करणारे उप कार्यकारी अभियंता प्रकाश देवके यांना त्यांच्या अखत्यारीत असलेल्या भागात रेल्वे स्टेशनचे काम करणारा ठेकेदार तीन महिन्यांपासून वीज चोरी करीत असल्याचे माहित नव्हते. तीन महिने महावितरण कर्मचारी व अधिकारी त्या भागात फिरकलेच नाहीत. जेव्हा अखिल भारत जर्नालिस्ट फेडरेशन राष्ट्रीय उपाध्यक्ष फिरोज पिंजारी, महाराष्ट्र राज्य महासचिव खलील सुर्वे, रायगड जिल्हा अध्यक्ष राजेंद्र जाधव यांनी व्हिडिओ व फोटोच्या माध्यमातून महावितरण उप-अभियंता डफल यांच्या लक्षात आणून दिले. वृत्तपत्र व पोर्टलला बातमी प्रकाशित झाल्यानंतर वरिष्ठांनी कारवाई आदेश दिल्यानंतर स्थानिक अधिकारी व कर्मचारी यांचा नाईलाज झाला व त्यांनी कारवाई केली. पण कारवाई करतानाही ठेकेदाराला कुठेही त्रास होणार नाही, याची सर्वस्वी काळजी घेण्यात आली. नाममात्र दंड आकारून ऊर्जा मंत्रालय व महावितरणच्या तोंडाला पाने पुसण्यात आल्याचे दिसून आले.

सर्वसामान्य नागरिकांच्या घराची वीज झटपट तोडणारे, आकडा टाकला म्हणून सर्वसामान्य नागरिकाला लाखोंचा दंड ठोकणारे महावितरणचे अधिकारी व कर्मचारी वीजचोर ठेकेदाराला पाठीशी का घालत आहेत? असा प्रश्न निर्माण झाला आहे. या प्रकरणात काही तरी काळेबेरे असण्याची शक्यता व्यक्त होत असून उप कार्यकारी अभियंता प्रकाश बळवंत देवके यांची सखोल चौकशी करण्यात यावी, अशी मागणी अखिल भारत जर्नालिस्ट फेडरेशनकडून करण्यात येत आहे.

## १५९ कामगारांचे थकीत वेतन व नुकसान भरपाई देण्याचे कामगार न्यायालयाने दिले आदेश

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

खालापूर तालुक्यातील मे.इंडिया स्टील वर्क्स लि., खोपोली या आस्थापनेतील १५९ कामगारांचे माहे डिसेंबर २०१९ ते ऑगस्ट २०20 कालावधीतील वेतन थकीत होते. मा.कामगार न्यायालयाने आदेश निर्गमित करुन १५९ कायम कामगारांना थकीत वेतनापोटी संबंधित व्यवस्थापनाने रु.९८ लाख ३८ हजार ७६० अदा करावेत तसेच प्रत्येक कामगारास नुकसान भरपाई म्हणून प्रत्येकी रु.२ हजार अदा करण्याचेही आदेश दिले आहेत.

खालापूर तालुक्यातील मे.इंडिया स्टील वर्क्स लि., खोपोली या आस्थापनेतील १५९ कामगारांचे माहे डिसेंबर २०१९ पासून वेतन थकित असणे तसेच कोविड-१९ चा प्रादूर्भाव रोखण्याकरिता व्यवस्थापनेकडून करावयाच्या उपाययोजना, या व इतर कारणांकरिता हिंद कामगार संघटनेने महाराष्ट्र शासन व इतर यांच्याविरुद्ध मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे याचिका क्र. १/२०२० दाखल केली होती. याप्रकरणी मा.उच्च न्यायालयाने दि.१९ ऑगस्ट २०२० रोजी आदेश निर्गमित करुन कामगारांच्या थकित वेतनाबाबत प्रचलित कायद्यातील तरतुदींनुसार उचित कार्यवाही करावी, असे निर्देश कामगार उप आयुक्त, रायगड यांना दिले होते. या पार्श्वभूमीवर न्यायालयाच्या आदेशानुसार कामगार उप आयुक्त, रायगड कार्यालयाने १५९ कायम कामगारांचे माहे डिसेंबर २०१९ ते ऑगस्ट २०२० कालावधीतील थकित वेतनाची तपशीलवार माहिती तयार करुन वेतन प्रदान अधिनियम, १९३६ कलम १५ अंतर्गत प्रकरण/दावा मा.कामगार न्यायालय, महाड येथे दाखल केला व कामगारांचे थकित वेतन अदा करण्याबाबत मा.न्यायालयाने संबंधित व्यवस्थापनास आदेश द्यावेत, अशी विनंती केली होती. या प्रकरणाच्या सुनावणीअंती मा.कामगार न्यायालयाने आदेश निर्गमित करुन १५९ कायम कामगारांना थकित वेतनापोटी व्यवस्थापनेने रु.९८ लाख ३८ हजार ७६० अदा करावेत तसेच प्रत्येक कामगारास नुकसान भरपाई म्हणून प्रत्येकी रु.२ हजार अदा करण्याचेही आदेश दिले आहेत.

## बेकायदेशीररित्या दारु विक्री करणाऱ्या भाजी विक्रेत्यावर कारवाई

**दै.रायगड नगरी । पनवेल**

भाजी विक्रीचा व्यवसाय असूनही त्याच्या आड बेकायदेशीररित्या दारु विक्री करणाऱ्या भाजीवाल्या विरो-धात खारघर पोलिसांनी गुन्हा दाखल करून त्याच्याकडून देशी दारु जप्त केली आहे.


खारघर वसाहत ही नो लिकर झोन असतानाही खारघर सेक्टर ३५ मध्ये रामविलास गुप्ता हे पदपथासमोर भाजी विक्री करत असत आणि मागे खुलेआम दारु विक्री करीत असल्याचा व्हिडीओ व्हायरल झाला होता. या संदर्भात त्या परिसरातील एका सोसायटीने खारघर पोलीस ठाण्यात या संदर्भात लेखी तक्रार केली होती.

त्या अनुषंगाने खारघर पोलीस ठाण्याच्या पोलिसांनी कारवाई करून त्याच्याकडून ६३० रुपयाचा देशी दारुचा साठा जप्त केला आहे.

## बल्लाळेश्वराच्या माघी गणेशोत्सवावर यंदाही कोरोनाचे सावट; नियमांचे पालन करून साजरा होणार उत्सव

**दै.रायगड नगरी । गौसखान पठाण**

**सुधागड/पाली** : कोरोनाच्या पार्श्वभूमीवर यंदाही शुक्रवारी (ता.४) होणारा बल्लाळेश्वराचा माघी गणेशोत्सव कोरोनाचे नियम पाळून होणार आहे. याबरोबरच यात्रा आणि काही उपक्रम होणार नाहीत. त्यामुळे अनेक भक्तांचा हिरमोड झाला आहे.



गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मंदिर व मंदिर परिसरात आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. हजारो जण मंदिराचा हा रोषणाई केलेला फोटो आपल्या स्टेटसवर व सोशल मीडियावर ठेवत आहेत. आणि गणेशोत्सवाची ओढ लागली असल्याचे सांगत आहेत. मात्र कोरोनाच्या पार्श्वभूमीवर यात्रा आणि धार्मिक उत्सव साजरे करण्यासाठी निर्बंध घालण्यात आले आहेत. परिणामी उत्स-वात यावर्षी यात्रेसाठी अथवा रस्त्यावर दुकाने लावण्यासाठी कोणत्याही प्रकारची परवानगी नाही. त्याचप्रमाणे जन्म सोहळ्याच्या कीर्तनास व इतर किर्तनास फक्त ५० जण उपस्थित राहतील. यावर्षी श्री गणेशाची पालखी देखील कोणताही गाजावाजा न करता साधेपणाने गाडीतून निघेल. तसेच पालखी रस्त्यात कोठेही थांबणार नसून लोकांनी पालखीस न ओवाळता फक्त नमस्कार करावे. तसेच भाविकांसाठी महाप्रसाद यावर्षी होणार नाही. मासोत्सवातील सर्व कार्यक्रमांचे थेट प्रक्षेपण केबल टीव्हीवर व फेसबुक लाईव्हवर दाखविण्यात येणार आहे. अशी माहिती देवस्थानचे अध्यक्ष ॲड. धनंजय धारप यांनी पत्रकारांना दिली.

## हातातील मोबाईल खेचून स्कुटीवरुन दोघेजण पसार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

आपल्या घरी जाण्याकरिता बसच्या प्रतिक्षेत असलेल्या एका इसमाच्या हातातील मोबाईल खेचून दोघेजण स्कुटीवरुन पसार झाल्याची घटना शेडुंग फाटा परिसरात घडली आहे.

सचिन गाणे (३०) हे शेडुंग फाटा येथे घरी जाण्यासाठी बसची वाट बघत उभे असताना स्कुटीवरुन दोन अनोळखी इसम त्यांच्याजवळ येवून त्यापैकी पाठीमागे बसलेल्या एका इसमाने त्यांच्या हातातील १५ हजार रुपये किंमतीचा रेड मी कंपनीचा मोबाईल फोन खेचून ते पसार झाले आहेत. याबाबतची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## सामाजिक बांधिलकी जपत केला युवा नेते केदार भगत यांनी वाढदिवस साजरा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

नेत्याचा वाढदिवस म्हणजे कार्यकर्त्यांची चंगळ दारूच्या पार्ट्या आणि दारूच्या नशेत डी जे वर. नाचणारे कार्यकर्ते परंतु असाच एक युवानेता अपवाद ठरला आहे तो म्हणजे भारतीय जनता पक्षाचा केदार भगत त्याने आपला वाढदिवस अनोख्या पद्धतीने साजरा केला आहे.



आपला वाढदिवस लोकाभिमुख कसा ठरेल याचा विचार करून आपल्या वाढदिवानिमित्त १००० गोरगरिबांना अन्नदान केल रस्त्यावरील गरिबांना ब्लँकेट चे वाटप केले. लोकांसाठी धावून जाणारा हा युवा नेता वर्षभर जनतेच्या सेवे साठी तत्पर असतो करोना काळात रुग्णालया पासून ते अन्नधान्याचे वाटप असो किंवा एन ९५ चे मास्क रोग प्रतिकारक शक्ती वाढावी म्हणून आर्सेनिक ३० चा गोळ्या कोरोना काळात परप्रांतीय मोठ्या प्रमाणात स्थलांतरित होत होते त्यांना पाण्याची व जेवणाची सोय सुधा केदार भगत यांनी केली होती. लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा आशीर्वाद व आमदार प्रशांत दादा ठाकूर , सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या प्रेरणेने जनतेची सेवा करण्याचा वसा हाती घेतला आहे तरुणांना हेवा वाटेल असा युवा नेता होणे नाहे म्हणून पनवेलकर म्हणतायत भविष्यात हा युवा नेता आम्हाला युवा नगरसेवक म्हणून जर मिळाला नक्कीच आम्हा जनतेच्या समस्या दूर होतील ह्या वाढदिवसा प्रसंगी सुमित दसवते, नितेश भगत, योगेश साळवी, हर्षद गडगे, संकेत दसवते, भावेश शिंदे, सचिन जाचक, गौरव सावंत, साहिल मोरे, जयदीप भगत, मंगेश भगत, निखिल भगत,यज्ञेश पाटील, अनिकेत सावंत, अनिल पशिलकर, शेषनाथ गायकर, मयुर पाटील, ब्रिजेश बहिरा, श्रेयस शिंदे, चैतन्य भगत, कपिल कुरघोडे, नेहाल गायकर, फिरोज शेख निलेश पाटील श्रेयस बहिरा मुन्ना बहिरा प्रशांत बहिरा रुपेश गोणे नैनेश वाघुलकर, सचिन कदम, सिद्धू मोरे, अथर्व पाटील सनी बेंडखळ आदी सह नेते व कार्यकर्ते उपस्थित होते.

## सुरक्षा रक्षक आणि सुरक्षा अधिकारांच्या वेतन व इतर भत्त्यांमध्ये वाढ करा ; भाजप कामगार आघाडीची मागणी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

रायगड जिल्हयातील सुरक्षा रक्षक व सुरक्षा अधिकारांच्या वेतन व इतर भत्त्यांमध्ये वाढ करण्यात यावी, अशी मागणी भाजप उत्तर रायगड जिल्हा कामगार आघाडी व जय भारतीय जनरल कामगार संघटनेच्यावतीने रायगड जिल्हा सुरक्षा मंडळाचे समीर चव्हाण यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.



या संदर्भात निवेदन देताना भाजप उत्तर रायगड जिल्हा कामगार आघाडी व जय भारतीय जनरल कामगार संघटनेचे अध्यक्ष जितेंद्र घरत, समीरा चव्हाण, रवींद्र कोरडे, ज्ञानेश्वर साखरे, चंद्रकांत कडू, मंगेश पाटील आदी उपस्थित होते.

या संदर्भातील निवेदनात म्हंटले आहे कि, रायगड जिल्हा सुरक्षा मंडळामध्ये जवळपास अडीच हजार सुरक्षा रक्षक व सुरक्षा अधिकारी कार्यरत आहेत. जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळाच्या नोंदीत सुरक्षा रक्षकांची पूर्वीच्या वेतनवाढीची मुदत ३१ डिसेंबर २०२१ रोजी संपुष्टात आलेली आहे. सध्याच्या महागाईचा दर व सुरक्षा रक्षक, अधिकारी यांच्या वेतनामध्ये फार तफावत आहे.

त्यामुळे सदर सर्व नोंदीत सुरक्षा रक्षक, अधिकारी यांना आपले जीवनमान चालविणे कठीण होत आहे. या संदर्भात मागणीचा सकारात्मक विचार करून वेतन व भत्त्यांमध्ये ०१ जानेवारी २०२२ पासून सुधारणा करून त्याचा लाभ रायगड जिल्हयातील सुरक्षा रक्षक व अधिकारी यांना देण्यात यावा, असेही या निवेदनात नमूद करण्यात आले आहे. सदरची प्रत राज्याचे कामगार मंत्री हसन मुश्रीफ, कामगार आयुक्त यांनाही देण्यात आली आहे.

मागील वेळी राज्याचे तत्कालीन कामगार मंत्री संभाजी पाटील निलंगेकर यांच्याकडे आमदार प्रशांत ठाकूर व कामगार आघाडीने केलेल्या पाठपुराव्यामुळे वेतनवाढ झाली होती, त्याचप्रमाणे ०१ जानेवारी २०२२ पासून पुन्हा पगारवाढ व्ह-ावी. अशी मागणी या निवेदनातून अधोरेखित करण्यात आली आहे.

## मृत काँग्रेस कार्यकर्त्यांच्या कुटुंबाला वाऱ्यावर सोडणार नाही : महेंद्रशेठ घरत

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील पाणदिवे गावातील निष्ठावंत काँग्रेस कार्यकर्ते मोहन पाटील यांचे निधन झाले तर आठ दिवसांनी त्यांच्या विवाहित मुलीने आपल्या वडिलांच्या अकस्मित निधनाच्या धक्याने नैराश्य पोटी आत्महत्या केली. त्यामुळे मोहन पाटील यांच्या कुटुंबावर दुःखाचे आभाळ फाटले आहे. त्यांच्या घरात कमविणारे कोणीही नसल्याने त्यांच्यावर मोठ आर्थिक संकट सुद्धा आहे. म्हणून पूर्व विभाग काँग्रेस कमिटी व चिरनेर जिल्हा परिषद विभाग काँग्रेस कार्यकर्त्यांना आर्थिक मदतीची आर्त हाक देण्यात आली होती.



विभागातील जिल्हा परिषद सद्स्य, सरपंच, उपसरपंच, व काँग्रेस कार्यकर्ते यांनी सढळ हस्ते या कुटुंबाला मदत करण्याचे आवाहन करण्यात आले.जेवढी मदत या माध्यमातून जमेल त्याच्या दुप्पट मदत रायगड जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष महेंद्रशेठ घरत यांच्या यमुना शैक्षणिक, सामाजिक संस्थे च्या माध्यमातून करण्यात येईल असे रायगड जिल्हा काँग्रेसचे डॅशिंग, कार्यसम्राट अध्यक्ष महेंद्रशेठ घरत यांनी सांगितले होते. त्या प्रमाणे जिल्हा अध्यक्ष महेंद्रशेठ घरत यांनी पाणदिवे येथे दुःखी कुटुंबियांच्या घरी जाऊन एक लाख रुपयांचा धनादेश आज त्यांच्या लहान मुलीकडे सुपूर्द केले. व त्यांच्या मुलींच्या शैक्षणिक खर्च सुद्धा जिल्हा अध्यक्ष महेंद्रशेठ घरत उचलणार आहेत. असे त्यांनी सांगितले.

यावेळी जिल्हा परिषद सदस्य बाजीराव परदेशी, जिल्हा उपाध्यक्ष मिलिंद पाडगावकर, जेष्ठ काँग्रेस कार्यकर्ते मनोहर गावंड, रायगड जिल्हा अल्पसंख्यांक कार्याध्यक्ष अखलाक शिलोत्री, जिल्हा सरचिटणीस गणेश सेवक, रायगड जिल्हा इंटकचे अध्यक्ष किरिट पाटील, घनश्याम पाटील, अलंकार परदेशी, आनंद ठाकूर, योगेश म्हात्रे, काशिनाथ गावंड, बाळकृष्ण म्हात्रे, मंगेश म्हात्रे, राजा भगत, महेंद्र पाटील, लंकेश ठाकूर, आदित्य घरत व मोठया संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.